वाचनालय, ठाणे.
विषय नाटक
दा. क्र. १८८७७

IRBK-0118877

१८८७७
२०।८।९

# कधीतरी... कोठेतरी

कधीतरी कोठेतरी एक कळी फुलते आहे
कधीतरी कोठेतरी एक फळ धरते आहे
कधीतरी कोठेतरी पालापाचोळा झडतो आहे
कधीतरी कोठेतरी एक कहाणी घडते आहे

IRBK-0118877

## वसंत कानेटकर यांचे साहित्य

**नाटके :**

वेड्याचं घर उन्हात
देवांचं मनोराज्य
प्रेमा, तुझा रंग कसा ?
रायगडाला जेव्हा जाग येते*
दोन ध्रुवांवर दोघे आपण
मत्स्यगंधा
मोहिनी
अश्रूंची झाली फुले
लेकुरे उदंड जाली
इथे ओशाळला मृत्यू*
घरात फुलला पारिजात
मला काही सांगायचंय
तुझा तू वाढवी राजा*
मीरा मधुरा
हिमालयाची सावली
बेइमान
अखेरचा सवाल
नलदमयंती
विषवृक्षाची छाया
कस्तुरीमृग
माणसाला डंख मातीचा
सूर्याची पिल्ले
एक रूप अनेक रंग
गोष्ट जन्मांतरीची
गाठ आहे माझ्याशी
कधीतरी कोठेतरी

**एकांकिका :**

व्यासांचा कायाकल्प
मद्रासीने केला मराठी भ्रतार
गड गेला, पण सिंह जागा झाला

स्मगलर सम्राटांच्या
न्यायालयात रामशास्त्री

झेंडे-पाटील महाविद्यालयात
गंगू, अंबू, विठा

आनंदीबाई आणीबाणी पुकारतात
शहाण्यांना मार शब्दांचा

**कादंबऱ्या :**

घर
पंख
पोरका

**कथा :**

लावण्यमयी

**टीका :**

नाटक, एक चिंतन

* तीन ऐतिहासिक नाटके एकत्र बांधलेली : 'शल्य'

# कधीतरी.... कोठेतरी

वसंत कानेटकर

पॉप्युलर प्रकाशन
मुंबई

कधीतरी.... कोठेतरी
पॉप्युलर प्रकाशन
( म–४९१ )

Kadhitari Kothetari
( Marathi Play )
Vasant Kanetkar

© सौ. उषा वसंत कानेटकर

पहिली आवृत्ती
१९८१ / १९०२

या नाटकाच्या प्रयोगाचे, भाषांतराचे
चित्रपटाचे इत्यादी सर्व हक्क
लेखकाच्या स्वाधीन आहेत.

मुद्रक
शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

प्रकाशक
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.
३५ सी ताडदेव रोड
मुंबई ४०० ०३४

आगाऊ लेखी परवानगीशिवाय
या नाटकाचा कोणीही प्रयोग करू नये.
तालमींना प्रारंभ करण्यापूर्वी परवानगी
आणि परवानगीमूल्य या संदर्भात
**सौ. उषा वसंत कानेटकर**
शिवाई, शरणपूर रोड,
नाशिक ४२२ ००२
या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.
दूरध्वनी ३०९२

नाट्यसंगीतात स्वतंत्र निर्मितीने क्रांती घडवणारे
आजचे प्रतिभाशाली सर्वश्रेष्ठ संगीतदिग्दर्शक
आणि माझे प्रेमळ सुहृद—

**पंडित जितेंद्र अभिषेकी**

यांना प्रेमादरपूर्वक—

## निवेदन

'कधीतरी....कोठेतरी' हे संगीत नाटक मराठी रसिकांना आज सादर होत असले तरी त्याचे लेखन दोन अडीच वर्षांपूर्वी म्हणजे 'गोष्ट जन्मांतरीची' लिहिण्याच्या आधी घडलेले आहे. नावावरूनच स्पष्ट व्हावे की हे एक कल्पनारम्य नाटक आहे. त्यातील शंखराजाच्या अद्‌भुत गूढतेचा स्पर्श मी एका पाश्चात्य नाटकातून ( डब्ल्यू. डब्ल्यू. जेकब–मंकीज पॉ ) घेतलेला आहे. मात्र बाकीची कथावस्तू स्वतंत्र आहे. बऱ्याच वर्षांपूर्वी माझे स्नेही आणि प्रख्यात गायक डॉ. वसंतराव देशपांडे यांनी पाकिस्तानातील 'खानाबदोष' नावाच्या टोळीतील रेशमा नावाच्या एका गायिकेची चित्तथरारक गोष्ट सांगितली होती. इतकेच नव्हे तर तिच्या काही गीतांचा टेपही त्यांनी मला ऐकवला होता. धुंद करणाऱ्या रेशमाच्या गळ्याचे आणि गायकीचे गुणदोषही त्यांनी त्याच वेळी मोठ्या रसाळपणे मला विशद करून सांगितले होते. त्याच वेळी "कधीतरी....कोठेतरी" नाटकाचा जन्म झाला. प्रत्यक्ष लेखन मात्र दोन अडीच वर्षांपूर्वी घडले. 'मत्स्यगंधा' नाटकाच्या वेळी संगीत नाटकाबद्दल लेखनाच्या दृष्टीने माझ्याकडून ज्या गफलती घडल्या होत्या, त्या या नाटकात टाळण्याचा मी प्रयत्न केला आहे. पंडित जितेंद्र अभिषेकी यांना केवळ सवड मिळावी म्हणूनच नव्हे तर त्यांच्या तब्येतीने फुलत उमलत या नाटकातले संगीत अवतरावे, या माझ्या आणि निर्मात्यांच्या आग्रहामुळेच हे नाटक उशीराने रंगमंचावर येत आहे.

या नाटकासाठी लेखनात पंडित जितेंद्र अभिषेकी, निर्माते मोहन तोंडवळकर यांचे अपरंपार साहाय्य झाले आहे. माझे तरुण स्नेही आणि उदयोन्मुख प्रतिभाशाली कवी श्री. किशोर पाठक यांनी तत्परतेने परिश्रमपूर्वक गीते करून दिल्याने या नाटकाच्या आकर्षकतेत भरच पडली आहे. श्री. अजित कडकडे, श्रीमती माधुरी पुरंदरे, श्री. नारायण बोडस यांच्यासारखे समर्थ गायक कलाकार आणि श्री. सखाराम भावे यांच्यासारखे मुरब्बी दिग्दर्शक लाभल्यामुळे या नाटकाच्या रंगतीमध्ये मोठीच भर पडणार आहे. कलावैभव या संस्थेचे इतर कलाकार आणि कार्यकर्ते यांनी या नाटकाच्या प्रयोगासाठी अपार मेहेनत घेतली आहे.
या सर्वांचा मी मनःपूर्वक ऋणी आहे.

वसन्त कानेटकर

"कधीतरी.... कोठेतरी" या नाटकाचा पहिला प्रयोग कलावैभव, मुंबई, या संस्थेने दिनांक १३ डिसेंबर १९८०, शनिवारी सकाळी दहा वाजता शिवाजी मंदिर, मुंबई, येथे सादर केला.

सूत्रधार : मोहन तोंडवळकर
निर्माती : माधवी तोंडवळकर
निर्मितिप्रमुख : सखाराम म्हात्रे
प्रकाश, नेपथ्य, दिग्दर्शक : सखाराम भावे
गीते : किशोर पाठक
संगीत दिग्दर्शक : पंडित जितेंद्र अभिषेकी
पार्श्वगायन : माधुरी पुरंदरे, राजा काटे, राजा काळे
रंगभूषा : दत्ता परब
संगीत साथ : चंद्रचूड वासुदेव, चिंतामणी हाटे, साई बँकर
ध्वनिमुद्रण : शशांक लालचंद, प्रदीप देशपांडे

## भूमिका

विश्वनाथबुवा : नारायण बोडस
जगदीश : अजित कडकडे
ऋता : माया राजाध्यक्ष
कृष्णकांत : शेखर खांबेटे
दामोदर : पद्माकर देशपांडे
मनोरमा : मंजिरी देव
अवलिया आणि भैरवबाबा : सखाराम भावे
रैना : माधुरी पुरंदरे

# कधीतरी .... कोठेतरी

चि. ....नाटक .. .. .. .. ..............

# कधीतरी कोठेतरी

## अंक पहिला

### प्रवेश पहिला

[ कधी तरी... कोठे तरी एक कहाणी घडते आहे. दुथडी भरून बारमाही वाहणाऱ्या एका नदीच्या काठचा रमणीय परिसर. नदीच्या पलीकडे दाट अरण्य असावे. अलीकडे टुमदार शहर. पण तेही नदीच्या पात्रापासून कोसभर तरी दूर असावे. एके ठिकाणी नदीला प्रशस्त जुना घाट. घाटाला लागूनच वर सोमेश्वराचे सुंदर मंदिर. रंगमंचावर मंदिराच्या बाहेरचा दर्शनी भाग तेवढा दिसतो आहे. एका बाजूला पिंपळपार वेळ सायंकाळची.

पडदा वर जातो त्या वेळी या मंदिरासमोरच, पाराजवळ फरशीवर वार्षिक रिवाजाप्रमाणे पंडित विश्वनाथबुवा पैठणकर गायला बसले आहेत. मागे साथीला तंबोरा घेऊन त्यांची कन्या ऋता बसली आहे. तसेच त्यांचे तरूण शिष्य कृष्णकान्त आणि दामोदरही. समोर पंडितजींच्या पत्नी मनोरमाबाई ऊर्फ माई फुलांची माळ गुंफत गाणे ऐकत बसल्या आहेत. पंडितजींचे भजन ऐन रंगात आले आहे.

शंकर हर हर गाती । गाती ॥
चितांग कंठी शेष धरण कर विष प्राशूनी
भय संगर चळ चळ कापती ।

मस्तकास शशी शोभा
पाठी कैलास उभा
पार्वतीश गण स्तविती ।

भजन ऐन रंगात आले असतानाच...

**विश्वनाथबुवा :** ( साथीदारांना थकल्यासारखा इशारा करीत. ) बस... बस... पुरे बेटा ऋता. खूप कमाल केलीत कृष्णकान्त, दामोदर, पण आज दिल नाही लागत.

**ऋता :** हे हो काय दादा ? आता आता कोठे रंग भरतो आहे.

**कृष्णकान्त :** आज दादांचा लाडका शिष्योत्तम जगदीश आलेला नाही म्हणून दादा नाराज आहेत. होय की नाही दामोदर ?

**दामोदर :** मला नाही तसं वाटत. कृष्णकान्त, दादांनी आपल्या शिष्या-शिष्यांत कधी तरी भेदभाव केलाय ? जे ऋताला, जगदीशला तेच आपल्याला. माझा तर्क वेगळाच आहे.

**बुवा :** अरे एवढ्या गोष्टीवरून तर्क-कुतर्क कसले करीत बसलात ? तुम्हाला तरी कळायला हवं, कलावंताच्या बाबतीत सरळसोट तर्क बेकार आहेत बेकार. (अरे वेधशाळेने फार तर पाऊस वादळाचा अंदाज सांगावा, पण इंद्रधनुष्याची सप्त-रंगी कमान कुठे, केव्हा आणि कशी उभी राहील त्याचं वेळापत्रक कधी केलंय का ? दिल नाही लागत म्हणजे नाही.)

**मनोरमा :** आठ दिवस मैफलीच चालल्या आहेत. किती शिणायचं माणसानं ? चला, उठावं आता. देवापुढचं गाणं नैवेद्यापुरतं असलं तरी देव गोड करून घेतो. तृप्ती होत नाही माणसांचीच.

**बुवा :** वा जी वा ! कधी कधी तुझ्या मुखातून देव बोलल्यासारखं वाटतं बघ.

**मनोरमा :** (पसारा आवरीत) पुरे, पुरे. चला, उठावं आता. दर्शन घेऊन घरी जाऊया.

**कृष्णकांत :** (नाराजीने) मग काय ? उठायचं दादा आता ?

**बुवा :** (मिस्किलपणे) काय प्रश्न विचारतोस रे कृष्णकांत ? कोणी आज्ञा केलीय ते जरा समजून जा. अरे तुला गंमत सांगतो एक. सव्वीस वर्षे चंदनवाडी संस्थानात दरबार गवई म्हणून नोकरी केली. पण या बाईसाहेबांना संस्थानात राहायचा कंटाळा आला तशी एक दिवस उठलो आणि दिवाणसाहेबांच्या तोंडावर राजीनामा फेकला. पुन्हा पुन्हा दिवाणसाहेब म्हणत होते की, "बुवा, एवढं वर्ष पुरं होऊ द्या. तुम्हाला पेन्शन देण्याची तरतूद करतो." मी म्हटलं, "हमको ये नहीं होना. नही नही—हरगीज नही !" दरबारातील इतक्या वर्षांची नेमणूक मी ही अशी (चुटकी वाजवीत) भिरकावून दिली. तेव्हापासून आपण फक्त एका साहेबाची मर्जी संभाळतो. या बाईसाहेब ! (उठत) आज्ञा प्रमाण. चला रे पोरांनो.

[बुवा, मनोरमाबाई आणि दामोदर मंदिरात जातात. पाठोपाठ कृष्णकांत जाऊ लागतो. तेवढ्यात—]

**ऋता :** (हळूच) कृष्णकांत जरा थांब.

**कृष्णकांत :** (थबकून, माघारी वळत) काय ग ऋताताई ?

**ऋता :** आज जगदीश का नाही आला ?

**कृष्णकांत :** कोणास ठाऊक! खरं तर त्यानं यायला हवं होतं.

**ऋता :** वर्षातून या एका पौर्णिमेच्या सायंकाळी सोमेश्वराच्या मंदिरापुढं गायचं दादांनी व्रत घेतलंय, हे काय त्याला ठाऊक नाही ?

**कृष्णकांत :** ठाऊक नसायला काय झालं ? काल त्याला बजाऊन सांगितलं होतं.

**ऋता :** मग काय म्हणाला तो ?

**कृष्णकांत :** छे छे. तसं म्हणाला बिणाला काही नाही तो पण– (घुटमळतो.)

**ऋता :** गेले काही दिवस तो तोंड चुकवतोय. माझंच नव्हे, दादांचंदेखील. झालंय काय त्याला ? रागावलाय का तो ?

**कृष्णकांत :** तसं वाटत नाही बोवा. पण—(घुटमळतो.)

**ऋता :** पण काय ? तुला काय माहीत असेल ते स्वच्छ सांगून टाक.

**कृष्णकांत :** अरण्येश्वरापाशी गानभरी लोकांच्या टोळीचा तळ पडला आहे, नव्हे !

**ऋता :** गानभरी लोकांची टोळी ? हा हो—गेल्या काही दिवसांत रस्त्यावरून गात गात जाताना दिसतात खरे, काही आदिवासी बायका-पुरुष. पण त्यांचं काय ?

**कृष्णकांत :** (चाचरत) न...नाही....नाही....त्यांच्या गाण्याबद्दल भरभरून खूप कौतुकानं बोलत होता जगदीश.

**ऋता :** (रोखून पाहत) एवढंच ?

**कृष्णकांत :** (गडबडून) हो; म्हणजे...

**ऋता :** (डोळे पाणावतात) कृष्णकान्त, तू माझा गुरुबंधू आहेस. मला फसवू नकोस. दादांच्या गळयाची शपथ—

**कृष्णकांत :** भलतंच काय हे ऋताताई ? तू माझी गुरुभगिनी तसा तो माझा गुरुबंधू. मी काहीही बोलली तरी—

**ऋता :** कृष्णकान्त तुला ठाऊक आहे, माझं लग्न ठरलंय त्याच्याशी. माझ्या आणि त्याच्या हितासाठी तरी तुला ठाऊक आहे ते तू स्पष्टपणे मला सांगायलाच हवंस.

**कृष्णकांत :** ऋताताई, समज, मला टाऊक आहे ते मी तुला सांगितलं आणि ते खोटं ठरलं तर ? मी घरदार सोडून दादांच्या जवळ गाणं शिकण्यासाठी येऊन राहिलोय. उद्या दादांचा माझ्यावर राग झाला तर मी कुठं तोंड काळं करू ?

**ऋता :** आणि दादा–माई माझ्यासाठी दुःखी कष्टी झाले तर तुला ते चालेल, असंच ना ?

**कृष्णकांत :** हे बघ ऋताताई, मला सगळं काही सांगता येणार नाही. पण इतकंच सांगतो की, तू इथं आलीच आहेस तर या मंदिरात थांब. घटकाभर

देवळाच्या गाभाऱ्यात उभी राहा. तुला खूप काही पाहायला मिळेल.

**ऋता** : तो...तो येणार आहे इथं ?

**कृष्णकांत** : माझा अंदाज चुकत नसेल तर चन्द्रोदयानंतर तो इथं आल्यावाचून राहणार नाही.

**ऋता** : आणि तो आला नाही तर मी एकटी कशी परत जाऊ रे ?

**कृष्णकांत** : एवढंच ना ? मी तुझ्या सोबतीसाठी थांबेन. नाही तरी पौर्णिमेच्या गंगास्नानासाठी मी थांबणारच आहे आज.

**ऋता** : पण....

**कृष्णकांत** : ( चाहूल घेत ) दादा-माई आणि दामोदर दर्शन घेऊन परतलेले दिसतात.

[ तेवढ्यात बुवा, मनोरमाबाई आणि दामोदर येतात आणि—]

**बुवा** : बेटी ऋता, कृष्णकान्त—अरे काय हे ? देवदर्शन सोडून इथं गप्पा छाटीत काय बसलात ?

**कृष्णकांत** : ( गडबडून ) न.... नाही... नाही... हा काय निघालोच मी.

[ जातो. ]

**ऋता** : ( विचारमग्न मुद्रेने जाता जाता थबकून, वळून ) दादा, आज मला थोडं थांबायला हवं इथं.

**मनोरमा** : अगबाई, एकटी— ?

**ऋता** : घाबरू नको माई. कृष्णकान्त आहे माझ्या सोबतीला. पौर्णिमेच्या गंगास्नानासाठी तो थांबणार आहे आज.

**बुवा** : पण बेटी, तू कशासाठी थांबणार आहेस इथं ?

**ऋता** : तुमच्याशी खोटं बोलता येणार नाही दादा मला. पण.... जगदीश येणार आहे इथं.

**मनोरमा** : उज्जेड ! यायचा असता तर मघाशीच आला नसता का ? वर्षातून हे एकदा गुरुपौर्णिमेला गायला इथं बसतात, हे त्याला माहीत नाही म्हणतेस ? मला त्याचं लक्षण काही ठीक दिसत नाही.

**ऋता** : म्हणूनच मला त्याच्याशी बोलून एकदा सोक्षमोक्ष लावायचाय.

**मनोरमा** : अग पण रात्रीच्या वेळी तू एकटी दुकटी परत कशी येशील ?

**बुवा** : त्याचा मोठासा सवाल नाही. आपण गाडी पाठवू. फार तर मी स्वतः येईन तिला न्यायला.

**मनोरमा** : पण मी म्हणते—

**बुवा** : काही म्हणून नकोस. ठीक आहे ऋता. तुला थांबायचं असलं तर थांब. तुला तो भेटणार असला तरी आमचं काही म्हणणं नाही. ( हसून ) बघतेस

काय अशी ? एवढ्या तेवढ्या बाबतीत तुझं मन मोडायला तुझी माई म्हणजे काही सख्खी आई नाही. जा, पळ, आधी देवदर्शन.

**मनोरमा :** ( ऋता गेलेली पाहात फणकाऱ्याने ) पोरीचे भारीच लाड चालवलेत हं तुम्ही.

**बुवा :** ( हसून ) जाऊ दे ग...आता या घरात थोडे दिवस राहिलेत तिचे.

**मनोरमा :** म्हणून काय हव्वं तसं बेलगाम वागू द्यायचं तिला ? तुम्ही कसं विसरता, ऋता आपल्या घरी वाढली असली तरी ती दुसऱ्याची मुलगी आहे.

**बुवा :** दुसऱ्याची म्हणजे तुझ्या बहिणीचीच ना ?

**मनोरमा :** ताईला आणि भगवंतरावांना मुलांचे भलभलते लाड कधी खपत नाहीत.

**बुवा :** अबे छोडो....! सात-आठ पोरांचा शिकारखाना संभाळता संभाळता तुझी ताई आणि भगवंतराव नुसते रिंगमास्टर झालेत रिंगमास्टर ! अग मुलांचे लाड ही संसार संगीतातील काय नजाकत आहे हे त्यांना काय कळणार ? मनू, अग निवडक जाणकारांची मैफील वेगळी आणि जत्रेतलं गाणं निराळं....

**मनोरमा :** पुढं जड जाईल, सांगून ठेवते.

**बुवा :** ( मिस्किलपणे ) अग जड गेलंच तर ते तिच्या भावी नवऱ्याला. जगदीशला, आपल्याला काय....

**मनोरमा :** तर तर— उचलली जीभ लावली टाळ्याला. उद्या....

**बुवा :** रागाऊ नकोस मनू. मला एक सांग, ऋता जन्माला आली तुझ्या ताईच्या पोटी, पण पोटच्या मुलीसारखी तिला लहानाची मोठी केलीस तू, हे तर खरं ? काय तिचं कमी केलंय ग आपण ? तिचं बरं वाईट आपल्याला कळत नाही ?

**मनोरमा :** ते कळून न कळून होणारं कधी टळतं का ? ( टचकन् डोळे पाणावतात. ) एरवी भरल्या घरात कशाला ताईची मुलगी आणून....

**बुवा :** हां हां.... मनू....मनू....नाही नाही....बुजलेल्या आठवणी पुन्हा उकरून काढायच्या नाहीत. ( मनोरमाबाई पदराने डोळे पुसू लागतात तशी....) मनू, तू मला डोळ्यांतून पाणी काढायला लावणार आहेस का आज ?

**मनोरमा :** ( लगबगीने डोळे पुसत ) नाही हो....खरंच नाही. हे पाहा मी पुन्हा डोळे पुसले. माझं एवढंच म्हणणं की....साखरपुडा झाला तशा अक्षता पडल्या की नवऱ्याबरोबर हवं तेव्हा हिंडावं फिरावं. पण लग्नाआधी चांदण्या रात्री...

**बुवा :** (मिस्किलपणा) हे पाहा....हे पाहा....माणसं आपलं तरुणपण विसरतात म्हणून अस्से घोटाळे होतात. मनू तू माझ्याकडं गाणं शिकायला यायचीस तो काळ आठव जरा. एका चांदण्या रात्री....

**मनोरमा** : ( दटावीत ) इश्श ! पुरे पुरे. किती पांचटपणा करायचा ? तो दामोदर-देखील हसतोय तुम्हाला.

**बुवा** : काय दामोदरबुवा ?

**दामोदर** : ( गडबडून हसू दाबीत ) न... नाही नाही.... मी नाही हसलो.

**बुवा** : नाही, हास हास. खुशाल हसून घे. दुसऱ्यांचा पागलपणा म्हणजे इतरेजनांना हसायचाच मोका की ! पण बच्चंजी, लक्षात ठेवा, आज ना उद्या तुम्हांलासुद्धा या वेशीखालून जायचंय.

[ त्याच वेळी ऋता आणि कृष्णकान्त येतात. ]

**ऋता** : कोणाला ? कोणत्या वेशीखालून जायचंय ?

**मनोरमा** : काही नाही. पुरे झाला पांचटपणा.

**बुवा** : पुरे तर पुरे. बरं झालं ऋता, कृष्णकांत तुम्ही अगदी वेळेवर आलात. तर दामोदर मघाशी मी काय सांगत होतो तुला ?

**दामोदर** : या इथंच, या पारापाशी पंचवीस वर्षांपूर्वी तुम्हांला तो अवलिया भेटला होता.

**मनोरमा** : ( अस्वस्थ होत ) पुन्हा कशाला उकरून काढायच्या त्या आठवणी ?

**बुवा** : मनू, तुला एवढं अस्वस्थ व्हायचं काही कारण नाही. फार खोल पाण्यात शिरून भलत्या गोष्टी मी बोलणार नाही. पण तुला ठाऊक आहे, ऋताच्या वाङ्-निश्चयाच्या वेळीच तो मंतरलेला शंखराज मी जगदीशला दिलाय. तेव्हा...

**मनोरमा** : होय; पण त्या वेळी त्याला सगळे इशारे, सगळ्या सूचना आपण बजावून सांगून दिल्या होत्या. नाही का ? मग आता पुन्हा....

**बुवा** : तेवढ्यानं भागेलसं वाटत नाही मनू. या मुलांना आणि ऋताला शंख-राजाचं बरं-वाईट मंत्रसामर्थ्य ठाऊक असायलाच हवं. एकदा घडलेल्या चुकीची जगदीश-ऋताच्या संसारात तरी पुनरावृत्ती व्हायला नको.

**मनोरमा** : ( अस्वस्थपणे ) मी गाभाऱ्यात देवापाशी जाऊन बसते. निघायची वेळ झाली म्हणजे मला हाक द्या.

**ऋता** : पण माई....

**बुवा** : तिला अडवू नकोस बेटी. जाऊ दे तिला [ माई जातात. त्या पाराकडे विश्वनाथबुवा पाहता पाहता कसल्याशा तंद्रीत जातात. आणि काही आगळे-वेगळे स्वरालाप घेऊ लागतात. एक अनोखेच गीत गुणगुणू लागतात. ऋता, कृष्णकांत आणि दामोदर एकमेकांस साश्चर्य खुणावून सावध करतात. काही क्षणानंतर समाधीतून सहज भानावर येत बुवा म्हणतात.... ] अरे, असे चमत्कारिक मुद्रा करून पाहात काय बसलात माझ्याकडे ?

**ऋता** : दादा... आताच पुन्हा एकदा तुम्ही तसल्या समाधीत गेला होता.

**बुवा :** खरंच म्हणता — ?

**कृष्णकांत :** आणि...आणि...अगदीच अनोखे स्वरालाप घेतलेत.

**दामोदर :** तुम्ही गुणगुणलात ते गीतसुद्धा तुमच्या गाण्यात कधीच ऐकलं नाही आम्ही.

**कृष्णकांत :** मला वाटतं गानभरी टोळीतले आदिवासी....

**बुवा :** ( गडबडीने ) असो, असो. तर त्या अवलियाबद्दल मी सांगत होतो. इथं याच पारावर चिलीम ओढत बसला होता तो. देवदर्शन घेऊन जरा टेकायचं म्हणून मी या पायरीवर बसलो. बसल्या बसल्या खुषीत येऊन मी सहजगत्या दाणेदार तान फेकली...

[ पटकन अंधार होतो. क्षणमात्र अंधारातच विश्वनाथबुवांचे तानांचे पलटे ऐकू येऊ लागतात. क्षणभराने रंगमंच उजळतो. निळसर धूसर प्रकाशाने पारावर अवलिया आणि तरुण बुवा यांच्या काळ्या छाया दिसतात. ऋता, कृष्णकान्त आणि दामोदर अंधारातच बाजूला उभे आहेत. बुवा गाताहेत आणि अवलिया चिलीम ओढता ओढता क्षणक्षणाला दाद देतो आहे. गाणे संपल्यावर— ]

**अवलिया :** ( उठून बुवांना मिठी मारीत ) वाहवा बेटा वाहवा. कमाल कर दिया.

**बुवा :** ( सोडवून अवलियाची पायधूळ मस्तकी लावत ) बाबाजी, ही सारी देवाची कृपा. लखनौच्या आमच्या खांसाहेबांची किमया आणि आपल्या-सारख्यांचे आशीर्वाद.

**अवलिया :** वा जी वा ! अरे तुझ्या गळ्यात सोनं आहे पण तुझी दानत तर पंचरत्नापेक्षा अधिक मोलाची आहे. मी प्रसन्न झालोय तुझ्यावर. बोल बेटा, तुला काय पाहिजे असेल ते या घडीला माग.

**बुवा :** फार ऋणी आहे बाबाजी मी तुमचा. पण मला काहीही नकोय. मागण्या-सारखी म्हणाल तर एकच दुर्मिळ विद्या होती, गाण्याची. पण ती तर मला पुरून उरेल इतकी भरभरून माझ्या गुरूनं मला दिलीय. आता या दुनियेत मागण्यासारखं दुसरं काय उरलंय ?

**अवलिया :** असं म्हणू नकोस बेटा. नुसत्या विद्येनं आयुष्यातले सगळे हिशेब चुकते होत नाहीत. या माझ्या हातात समृद्धीच्या ऋद्धी-सिद्धी आहेत. तुला काय हवंय ते मोकळ्या मनानं सांग.

**बुवा :** काही नको बाबाजी, मला खरंच काही नकोय.

**अवलिया :** अरं तू कल्पतरूच्या खाली उभा आहेस....

**बुवा :** तरीदेखील मी तृप्त आहे. बाबाजी, मला काहीसुद्धा नकोय.

**अवलिया :** ( क्षणार्धं न्याहाळीत ) तर मग....मला हवा होता तो तूच आहेस.

बेटा, तुला काही मागायचं नसलं तरी माझी इच्छा तू पुरी केली पाहिजेस. बेटा, तू तृप्त आहेस म्हणूनच एक दुर्मिळ शक्ती, केवळ ठेव म्हणून मी तुझ्या स्वाधीन करणार आहे (आपल्या झोळीतून एक मला मोठा शंख काढीत) हा शंखराज. हा शंखराज फक्त तृप्त माणसांच्या घरातच नांदतो आणि सुखसमृद्धीची बरसात करतो. तुझ्या घरातल्या देव्हाऱ्यात या शक्तीची स्थापना कर.

**बुवा :** शंखराज म्हणजे सोमेश्वराचाच अवतार. तो तर मला नित्य पूजनीय. द्या बाबाजी, तुमची इच्छा मी आनंदानं पुरी करीन.

(ओंजळ पुढे करतो तशी....)

**अवलिया :** थांब. या दानातली एक शर्त तू नीट समजून घ्यायला हवीस. हा शंखराज ओंजळीत घेऊन कधीही काहीही मागायचं नाही. मनोमनीसुद्धा इच्छा करायची नाही. तूच नव्हे, दुसऱ्या कोणीही मागायचं नाही. इच्छासुद्धा करायची नाही.

**बुवा :** पण बाबाजी...

**अवलिया :** जो जे मागेल ते त्याला जरूर मिळेल. पण जे मिळेल त्यासाठी आयुष्यभर पश्चात्ताप करावा लागेल.

**बुवा :** ( चकित होत ) बाबाजी, तुम्ही काय म्हणता ते मला समजत नाही.

**अवलिया :** पुन्हा सांगतो. ज्यानं मला हा शंखराज दिला त्याच्याच शब्दात सांगतो—जो जे मागेल ते त्याला जरूर मिळेल पण जे मिळेल त्यासाठी आयुष्यभर पश्चात्ताप करावा लागेल. कधीही, काहीही मागायचं नाही. एवढा संयम, इतकं मनोबल आहे तुझ्यापाशी ?

**बुवा :** बाबाजी, तुम्ही माग म्हणत होता तेव्हाही मी काही मागितलं नाही. तेव्हा ती चिंता तुम्ही करू नका. पण मला एकच सांगा, या शंखराजाच्या मंत्रशक्तीचा प्रत्यय कोणाला आलेला आपण प्रत्यक्ष पाहिला आहे का ?

**अवलिया :** हा बेटा. नुसता पाहिला नाही. प्रत्यक्ष मीच घेतलाय.

**बुवा :** (ओरडून) खुद्द आपण.? पण म्हणजे बाबाजी——

**अवलिया :** थांब. मी काय मागितलं, मला काय मिळालं आणि त्यासाठी मला काय भोगावं लागलं ते मला विचारू नकोस. माझी ही....ही....दशा झालीय तवढीच डोळयानं पाहून ठेव. विषाची परीक्षा पाहू नकोस.

**बुवा :** बाबाजी, हा शंखराज तुम्ही मला कशासाठी देता आहात ?

**अवलिया :** कोणा तरी तृप्त माणसाला ही शक्ती दिल्यावाचून मला मनःशांती नाही. मला सद्गती नाही. बेटा हा शंखराज स्वीकार आणि मला मुक्त कर. काहीही मागत नाहीस तोवर या शक्तीला तुला भ्यायचं मुळीच कारण नाही. पण जर कधी काळी चुकूनसुद्धा काही मागण्याच्या मोहाला बळी पडलास——

देव करो आणि तशी पाळी तुझ्यावर न येवो—(थबकून) तसं काही विपरीत घडलंच तर येतील ते भोग निमूटपणानं सोस आणि अशाच कोणा तृप्त शिष्याला तू ही शक्ती अर्पण कर तेव्हाच तू मुक्त होशील. तुला मनःशांति लाभेल. हे सगळं जाणून, समजून उमजून मला सांग—हवाय तुला हा शंखराज ?

**बुवा :** होय बाबाजी. मी तुम्हाला वचन देतो शंखराजाकडं, मी कधीही काहीही मागणार नाही. द्या माझ्या ओंजळीत.

(वंदन करून हात पसरून उभे राहतात तशी—)

**अवलिया :** (अत्यानंदाने शंखराज हाती देत) तथास्तु, तथास्तु. ईश्वरा, तुझी लीला अगाध आहे. गा...गा...बेटा गात राहा.

[ विश्वनाथबुवा गाऊ लागतात. पुन्हा अंधार होतो. फक्त बुवांचे तानाचे पलटे कानावर राहतात. क्षणभराने रंगमंच पूर्ववत उजळतो. ऋता, दामोदर आणि कृष्णकांत भारल्यासारखे उभे आहेत. समोर बुवा सांगता सांगता थबकले आहेत ]

**बुवा :** तर अशी ही शक्ती...हा शंखराज. ऋता तुझ्या लग्नाच्या वाङ्-निश्चयाच्या वेळी मी जगदीशला अर्पण केला. सगळ्या सूचना, सगळे इशारे देऊन...पुनः पुन्हा सांगून, बजावून....तो प्रतिज्ञेवर होय म्हणाला तेव्हाच. तुला आज तो भेटला इथं तर त्याला सावध कर. तेवढ्यासाठीच तुला इथं थांबायची परवानगी दिलीय मी. दामोदर, मनूला बोलाव. चला जाऊया आपण. [ दामोदर तंबोरा घेऊन जातो ] कृष्णकांत...

**कृष्णकांत :** दादा, मी ऋताताईच्या सोबतीसाठी थांबतोय इथं.

**बुवा :** मनूला घरी सोडून अमळशानं मी गाडी घेऊन परत येतोय इथं—या वेडाबाईला घेऊन जाण्यासाठी.

**ऋता :** (विचारमग्न) दादा, मला एकाच प्रश्नाचं खरं खरं उत्तर द्याल ?

**बुवा :** (हसून) हो हो....का नाही ? कृष्णकांत ही वाद्यं घेऊन चल आणि गाडीत ड्रायव्हर झोपला असला तर त्याला जागं कर. (कृष्णकांत तबला वगैरे घेऊन जातो. तो गेल्यावर) हूं, विचार बेटी !

**ऋता :** दादा, शंखराजाच्या मंत्रशक्तीचा प्रत्यय तुम्ही कधी घेतला होतात ? **शंखराज** ओंजळीत घेऊन तुम्ही कधी काही मागितलं होतं ?

**बुवा :** (दचकून थबकतात. प्रक्षोभाने) नको तो प्रश्न विचारलास. होय, घेतला होता. पण मी काय मागितलं आणि मला काय मिळालं ते विचारू नकोस. तेवढं विचारू नकोस. त्या पायी अपार अपार दुःख सोसावं लागलं मला. त्या...त्या अवलियासारखं (थबकून) म्हणून म्हणतो—जगदीशला सावध कर. [ झटकून जातात. ऋता विचारमग्न तशीच पारावर बसते. अंधारून येत असतानाच

पार्श्वभागी चन्द्रबिंब उगवते. चांदण्याचा प्रकाश. देवळात सायं-आरती होते. ही संपत असतानाच कृष्णकांत येतो. )

**ऋता :** दादा आणि माई गेले ?

**कृष्णकांत :** हो. दामोदरही त्यांच्याबरोबर गेला. ( सभोवार चाहूल घेतो. )

**ऋता :** जगदीश, आज इथं येईल असं वाटतं तुला ?

**कृष्णकांत :** चन्द्रोदय तर झाला. एवढ्यात तो यायला हवा.

**ऋता :** शंखराजाच्या मंत्रशक्तीची प्रचीती घ्यायची तर दुर्बुद्धी त्याला झाली नसेल ?

**कृष्णकांत :** नाही. तसं वाटत नाही. निदान अद्याप तरी नाही.

**ऋता :** कशावरून ? तुझ्याशी बोललाय तो काही याबद्दल ? ( कृष्णकान्त गप्प राहतो तशी—) तुझ्या गप्प बसण्यानं मी फारच—

**कृष्णकांत :** ( कानोसा घेत दचकून ) ऐक ऐक—( दूरवरून कोणा पुरुषाच्या आवाजातील आलापी ऐकू येते तशी—) तटावरून येतोय हा आवाज त्याचाच.

**ऋता :** चमत्कारच आहे. पण हा गातोय कशासाठी ? आणि तटावरून का ?

**कृष्णकांत :** हे गाणं नव्हे ऋताताई. ही हाक आहे हाक.

**ऋता :** अगबाई ! हाक ? कोणाला ?

[ दूरवर नदीच्या पैलतीरावरून कोणा स्त्रीच्या आवाजात स्वरालाप ऐकू येतात तशी—]

**कृष्णकांत :** ऐक....ऐक...हा त्या हाकेला प्रतिसाद.

**ऋता :** कोणाचा प्रतिसाद ? कोण आहे ही मुलगी ? काय आहे हा सगळा रहस्यमय प्रकार ?

**कृष्णकांत :** तुझा तुलाच सगळा उलगडा होईल. फक्त आता मंदिरात जा आणि आडोशाला उभी राहून पाहा. इतक्यात तो इथं येईल आणि तीदेखील. मी खाली घाटावर आहे. [ झटकन जातो. ]

( पुरुषाच्या आणि स्त्रीच्या आवाजातील आलापींचा साद प्रतिसाद ऐकत बावरलेली ऋता पाहत पाहत मंदिरात जाते. रंगमंच स्वच्छ चांदण्याने उजळतो. क्षणभरात नदीच्या दिशेने पाहात पाहात आलापीची साद घालीत जगदीश प्रवेशतो. तरुण, देखणा, स्वप्नाळू डोळ्यांचा. या क्षणी तरी झपाटलेला.

मंदिरामागील उंचवट्यावरून चोर-पावलाने एक तरुण मुलगी उतरताना दिसते. अस्पष्ट अंधारात अधिकच गूढरम्य. वेश जिप्सी. वाट पाहून शिणलेला जगदीश पारावर गुणगुणत टेकतो. ती तरुणी झाडामागून हळूच येते आणि त्याचे एकदम डोळे झाकते तशी—

**जगदीश :** ( दचकून ) कोण ? ( डोळ्यांवरले हात चाचपीत ) रैना ! [ तशी

हात सोडून ती खळखळून हसते. पारावरून उडी मारून त्याच्यासमोर उभी राहते. ] मला नाही हसू येत. मला नाही असली मस्करी आवडत. वेड्यासारखा किती वेळचा वाट पाहत मी तटावर उभा होतो ते तुला ठाऊक आहे ! [ ती हसून मानेने होय म्हणते तशी ] मग का नाही आलीस तू ? तू काय नुसती गंमत पाहात उभी होतीस ? का माझा असा छळ चालवला आहेस तू ? वचन देतेस आणि पाळत मात्र नाहीस. मी तुझं एवढं वेड घेतलंय म्हणून तू मला अशी शिक्षा देते आहेस का ? [ ती मानेने 'नाही' म्हणत त्याच्या तोंडावर हात ठेवून त्याला गप्प करते आणि गळयात अडकवलेले स्वरमंडलासारखे वाद्य छेडीत रैना गाऊ लागते. दर्दभरी स्वरात ती म्हणते....... !

**रैना :** राजसा मी नाही अपराधी
रानामधली वाट वाकडी दुथडी भरली नदी ॥

**जगदीश :** तू गायला लागलीस की मला रागावणंसुद्धा अशक्य होतं. पण रैना काही तरीच लटकी कारणं सांगू नकोस, रान तेच, वाट तीच आणि नदीही तीच. किती तरी वेळा अगदी मिट्ट काळोख्या रात्रीसुद्धा—तू—

**रैना :** होय होय रे पण——

नजरांचे भाले रोखून भवती फिरती
चुकवुनी तयांना वाट मी धरली भलती
मी गानभरी रे सुटली माझी रीती
अशी कशी खुळ्यापरि जडली मज ही प्रीती ॥ राजसा०

**जगदीश :** रैना रैना...तुझा माझ्यावर विश्वास नाही ? या सोमेश्वराच्या मंदिरात देवापुढं आपण आणाभाका घेतल्या—

**रैना :** असं नाही रे जगदीश. तुला कसं सांगू ? काय सांगू अरे—

सापडले तर सहज कधी मी, करतील मला बंदी
गणतिल पापी नसताना मी म्हणतिल छंदी फंदी
रे अपराधी नसुन पुरी मी तुटतिल नाती गोती
जान करिन कुर्बान जरी तू होशील माझा साथी ॥
राजसा, मी नाही अपराधी ॥

**जगदीश :** यातून एकच मार्ग दिसतोय मला. आपण लग्न करून टाकायचं.

**रैना :** लग्न—?

**जगदीश :** होय लग्न. आणि तेही उद्याच्या उद्या.

**रैना :** उद्या ? (हसते) तुझ्या घरात घेतील मला ?

**जगदीश :** नाही घेतलं तर आपण दुसरं घर करू.

**रैना :** नाही तर आपण उघड्यावर राहू. आमच्या गानभरी लोकांसारखं.

छत आकाशाचे आपुल्या घराला
तृणांकुरांची शय्याआणिक तुझाच बाहु उशाला, ।
ह्या शापित आयुष्याला ॥
गळ्यात घालुन गळे मिळूनी ही धुंद करू उपवने
सुरात मिसळुन सूर उलगडू दोन जिवांची मने
स्वैर मोकळे पिसाट जगू या भिरकावुन दुनियेला
ह्या शापित आयुष्याला ॥ छत०
साहु कशी विजनोहि प्रियतमा जाऊ नको परदेशी
तुझ्यावाचुनी मोडून घरटे होइन रे वनवासी
पंख नभाचे लावुन उडुया सोडून ह्या धरतीला
ह्या शापित आयुष्याला ॥ छत०

**जगदीश :** ( भारावून तिला न्याहाळीत ) किती सुंदर स्वप्न बोल बोल म्हणता रंगवलंस. खरंच माणसाला कधी तरी इतकं स्वैर, इतकं मुक्त होऊन जगता येईल का ?

**रैना :** ( खट्याळपणे हसत ) हिम्मते मर्दा तो मददे खुदा ।

**जगदीश :** माणसाच्या जगात तरी ते कठीण दिसतं.

**रैना :** अरे माणसांच्याच जगात राहून एका विरहिणीनं ही हिम्मत दाखवली. तिला तर साथ द्यायला हाडामासाचा प्रियकर देखील नव्हता.

**जगदीश :** कोण होती ती विरहिणी ?

**रैना :** ( गाते )

**मेरे तो गिरिधर गोपाल दूसरो न कोयी.... दूसरो न कोयी...**

**जगदीश :** मीरा. ( सुस्कारून ) तिची तर दुनियाच वेगळी होती.

**रैना :** वेगळी ? छे छे हीच. इथलीच. असल्याच माणसाची. काय अजीब फैसला आहे पाहा जगदीश. अरे तिनं देवाला नवरा मानला तर या दुनियेनं तिचा छळ केला. एक हाडामासाचा माणूस नवरा म्हणून पत्करण्यासाठी. आणि मला हाडामासाचा तू हवा आहेस तर माझी दुनिया म्हणते तू तर देवाला वाहिलेली...

(गाते )

**मेरे तो गिरीधर गोपाल दूसरो न कोई... दूसरो न कोई...**

[ तेवढ्यात झुडपात कोठे खजबज होते. तशी रैना घाबरते. जगदीशला बिलगत ओरडते—]

कोण ? कोण आहे ?

[ क्षणभर स्तब्धता. ]

**जगदीश :** ( तिला जवळ घेत ) कोणी नाही. तुला भास झाला असेल.

**रैना :** भास नाही जगदीश. माझ्या मागावर आलेली पावलं मला ओळखतात.

**जगदीश :** ( सोडवून घेत ) तुझ्या-माझ्या मार्गात कोण आडवा येतोय ते पाहू देच मला.

[ असे उद्‌गारत, रैना 'नको नको जगदीश' म्हणून विनवणी करीत असतानाच खजबजीच्या दिशेने धावत जातो. क्षणार्ध स्तब्धता. अगदी अकल्पितपणे मागून कोठूनतरी चोरपावलाने येतो भैरवबाबा. भैरवबाबा एक म्हातारा, भला दांड, उंच आणि उग्र मुद्रेचा, गानभरी टोळीचा नायक. रंगीत लुंगीवर रंगीत कुडता गळ्यात कवड्याच्या रुद्राक्षाच्या माळा, डोक्याला लाल रुमाल आवळलेला. भव्य दाढीमिशा. भैरवबाबा रैनाच्या पाठीशी येऊन उभा राहिला तरी तिला कळत नाही. मात्र त्याने तिच्या खांद्यावर हात ठेवताच ती दचकते. अस्फुट किंचाळते. थरथर कापू लागते. तो फक्त तिच्या नजरेत तीव्र दृष्टीने रोखून बघतो. तशी भयाने चाचरत ती "भैरवबाबा.... म.... म... मी" तो फक्त डोळे वटारतो. मानेने "नाही नाही" एवढीच सक्त ताकीद देतो आणि खालच्या आवाजात दरडावतो— "हे कधीच होणार नाही. गानभरी हे कधीच खपवून घेणार नाहीत. मुकाट त्याचा नाद तू सोड. नाही तर बोकडासारखी तुझी मुंडी तोडून देवीला वाहीन, त्याची खांडोळी होतील.—"

[ रैना 'जगदीश' अशी खोल आवाजात हाक मारू बघते, पण तेवढ्यात भैरवबाबा एका हाताच्या पंजाने तिचे तोंड दाबतो. ती भोवळ येऊन पडते. तेवढ्यात तो तिला सावरतो आणि लीलया तिला उचलून खांद्यावर टाकून मागल्या पावली तिच्यासह अंधारात नाहीसा होतो. क्षणार्धाने जगदीश, गेलेल्याच्र वाटेने मागे पहात पहात म्हणत येतो की...."छे, छे, कोणी नाही. कोणीसुद्धा नाही. मी अगदी तटापर्यंत जाऊन पाहिलं तरी..." आणि थबकून "अरे ? हे काय ? रैना– ?...रैना कुठाय ?" असे उद्गारत...."रैना....रैना..." अशी हाक मारू लागतो. तशी शांत पावलाने समोरून येते ऋता. आणि...]

**जगदीश :** ( तिला पाहून दचकून ) कोण ऋता ? तू....

**ऋता :** होय, मीच.

**जगदीश :** तू....तू इथं कशी....?

**ऋता :** माझ्या दुर्भाग्यानं. तुझी रैना तुला पुन्हा भेटणार नाही. भैरवबाबा तिला उचलून घेऊन गेला.

**जगदीश :** भैरवबाबा ? गानभरी टोळीचा नायक भैरवबाबा तो इथं आला

होता ?

**ऋता :** हो. तिला सक्त ताकीद देऊन घेऊन गेला तो.

**जगदीश :** सक्त ताकीद ? कसली ताकीद ?

**ऋता :** हे कधीही होणार नाही. गानभरी हे कधीच लपवून घेणार नाहीत. मुकाट त्याचा नाद तू सोड. नाही तर बोकडासारखी तुझी मुंडी तोडून देवाला वाहीन. त्याची खांडोळी खांडोळी होतील.

**जगदीश :** ( रागाने ) इतकी हिम्मत ? तिनं काहीसुद्धा प्रतिकार केला नाही ?

**ऋता :** ती बिचारी भीतीनं थरथरत भोवळ येऊन पडली. तशी तिला उचलून खांद्यावर टाकून तो चालता झाला ?

**जगदीश :** हा मी त्याला गाठतो. जाऊन जाऊन तो किती दूर....( म्हणत जाऊ लागतो तोच.... )

**ऋता :** थांब जगदीश ( ती त्याची वाट अडवते ). त्या जंगली राक्षसाला तू पाहिला नाहीस. त्याच्या वाटेला तू जाऊ नकोस.

**जगदीश :** तो जंगली राक्षस असला तरी या भूमीवर काही जंगलचा कायदा चालू नाही. माझी वाट सोड तू.

**ऋता :** नाही सोडणार.

**जगदीश :** रैनाचा जीव धोक्यात आहे, ऋता.

**ऋता :** माझं उभं आयुष्य पणाला लागलंय. माझ्या प्रश्नांची उत्तरं मिळाल्याशिवाय मी तुला जाऊ देणार नाही जगदीश.

**जगदीश :** तू इतका वेळ इथं होतीस ?

**ऋता :** हो.

**जगदीश :** तर मग तुझ्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं तुला मिळाली आहेत.

**ऋता :** मला दिलेलं वचन तू मोडणार आहेस ? तू माझा विश्वासघात करणार आहेस ?

**जगदीश :** ( आवेगाने ) ते तू काहीही समज. पण मला रैना हवी आहे. आम्ही एकमेकांवर प्रेम करतो. मी रैनाशी लग्न करणार आहे.

**ऋता :** ( उपहासाने ) प्रे–म–? तसं तू माझ्यावरही प्रेम करीत होतास. इतकंच नव्हे तर आपला वाङ्‌निश्चयही...

**जगदीश :** ऋता, ऋता, तुझ्यावर मी प्रेम कधीच केलं नाही. दादांचं गाणं मला हवं होतं म्हणून मी आपल्या वाङ्‌निश्चयाला संमती दिली होती.

**ऋता :** आणि आता हा वचनभंग केल्यानंतर तुला दादांचं गाणं मिळेल ?

**जगदीश :** नाही मिळणार. मला त्याची मातब्बरीही राहिलेली नाही.

**ऋता :** ( विस्मयाने ) गाण्यावरची देखील तुझी निष्ठा उडाली ? जगदीश

जगदीश, तू पागल तर झाला नाहीस ?

**जगदीश :** ( थंडपणे ) तू म्हणतेस ते काही खोटं नाही. रैनाची माझी भेट झाल्यापासून ध्यानी-मनी-स्वप्नी मी सतत तिचाच ध्यास घेतलाय.

**ऋता :** पण का ? कशावर इतका हुरळून गेला आहेस तू ?

[ ह्या प्रश्न ऐकतच विश्वनाथबुवा येतात. सहजगत्या थबकतात. जरा आडो-शाला उभे राहूनच ऐकतात. ]

**जगदीश :** तुला काय वाटतं ? मी तिच्या रूपावर भाळलोय ? तू पाहिली आहेस तिला ? ती काही सुंदर नाही आणि असती तरी रूपावर लट्टू होण्याइतका मी लंपट नाही.

**ऋता :** ते मला ठाऊक आहे; पण मग.... ( घोटाळते )

**जगदीश :** ऋता, तू तिचं गाणं ऐकलं नाहीस का आता ?

**ऋता :** होय. ऐकलंय. सुंदर आवाज आहे तिचा. छान गाते ती.

**जगदीश :** ( आवेशाने ) सुंदर ? छान ? जाळून टाक ते गुळगुळीत शब्द.

काळजाला कणाकणाने वेढून जातो तिचा दर्द
फेसाळून येते तिची तान
आणि पालापाचोळ्यागत भिरभिरतात
आपल्या बंदिस्त रागिण्या
चांदण्याचं तेज पिऊन आलेलं ते गाणं
एक तुफान आहे
माझ्या नसानसात भरून घेतलीय मी सरगम
भिजलेल्या चराचरातून मुक्त कंठाने
फुटलेला पहिला वहिला राजस हुंकार
दडलाय तिच्या गळ्यात
त्याला झुळझुळत्या झऱ्याचा ताल आहे
धुक्याची धुंदी आहे
आणि सृष्टीच्या लयीचं लावण्य आहे
अग, जेव्हा ती आपल्या पदन्यासातून
स्वरांची मुक्तकं उधळीत येते
तेव्हा सृष्टीचं तारुण्य पानापानांतून ओथंबून येतं
झंझावाती वादळाचे प्राण घेऊन येतं हे गाणं
आणि अल्लड बादलासारखं अवचित कोसळून जातं
तेव्हा देहावर षडजाचा काटा फुलतो
आणि श्वासाश्वासातून पंचमाची बरसात होते

ह्या गाण्याने पिसाटून गेलंय माझं मन
माझा रोम रोम।

गाणं फुलावं उघड्या अरण्यात, सूर शोधावा वादळ वाऱ्यात आणि ताल उचलावा दऱ्या खोऱ्यातून खळखळणाऱ्या ओहोळात !

**ऋता :** तू एवढं काव्यमय कधीपासून बोलायला लागलास ?

**जगदीश :** नाही ऋता, ते तुला कधीच कळणार नाही. मला क्षमा कर. मला रैनाचं गाणं हवंय. माझा श्वास नव्हे प्राण आहे तिचं गाणं. मला रैना हवीय कारण मला तिचं गाणं आत्मसात करायचंय्.

( गुणगुणतो " छत आकाशाचं आपुल्या घराला " )

**ऋता :** जगदीश...जगदीश...अरे गाणं निराळं आणि संसार निराळा.

**जगदीश :** हा पोटार्थी पांढरपेशांचा हिशेब झाला. महिनेनं महिने अंधाऱ्या एकांतात गळा घासत बसायचा आणि कधीतरी दोनचार तासांची महालातील मैफल गाजवायची...ही गानसाधना नव्हे ऋता. गाणं हा उभ्या आयुष्याचा नव्हे....अवघ्या अस्तित्वाचा गाभा झाला पाहिजे. पण सुरक्षितपणाच्या कुंपणात राहून संसाराची प्रत्येक सुरकुती साफ करीत राहिलेल्या पंडितजींना आणि खांसाहेबांना हे मर्म कधीच कळायचं नाही. ऋता, तू दादांचं गाणं ऐकतच लहानाची मोठी झाली आहेस. रैनाचं दर्दभरी सहज उचंबळलेलं गीत तू आताच ऐकलं आहेस. खरं खरं सांग, ती तसली भन्नाट तुफान गीत गायकी दादा कधी तरी गाऊ शकतील ? [ या प्रश्नाबरोबरच, तंद्रीत हरवलेले विश्वनाथबुवा, एक गानभरी गीत वेगळ्याच ढगाने गात पुढे येतात. पिसाटपणे गातात. जगदीश आणि ऋता क्षणभर अवाक होऊन ऐकतच राहतात. अखेर थबकून बुवा पारावर बसतात. ऋता त्यांच्याजवळ जाऊन... ]

**ऋता :** दादा, तुम्हाला बरं वाटतंय ना ?

[ बुवा तिच्या मस्तकावरून प्रेमाने हात फिरवतात ]

**जगदीश :** दादा क्षमा करा, पण ही गायन साधना तुम्ही कधी केलीत ? आजवर आम्हाला कधी तिचा सुगावाही लागू दिला नाहीत.

**बुवा :** ( मनःपूर्वक हसतात ) तू प्रश्न विचारलास, म्हणून जरा प्रात्यक्षिकाची एक झलक दाखविली. छोड दो. जगदीश, आमच्या खाँसाहेबांचा एक किस्सा सांगतो तेवढा ऐक. प्रख्यात ठुमरी गायिका बेगम रशिदाबानू एकदा खांसाहेबांच्या घरी आली आणि हट्ट धरून बसली की खांसाहेब, मला तुमची गायकी शिकवा. मी तुमचा गंडा बांधायला तयार आहे. त्यावर खांसाहेब तिला म्हणतात— बेटी ठुमरीला दुनियेत तोड नाही. तरी देखील ती सोडून माझी गायकी गायची अभद्र इच्छा तुला का झाली ग बये ? तू बुद्धिमान आहेस....माझं गाणं तू

उचलशीलदेखील. पण त्यानंतर मात्र तुला ठुमरी गाता यायची नाही. रशीदाबानू आनंदानं म्हणाली....चालेल खांसाहेब, ठुमरी गमावली तरी माझी हरकत नाही. खांसाहेब म्हणतात–हरकत तुझी नसेल बेटा, हरकत माझी आहे. अग उद्या मला ठुमरी ऐकायची इच्छा झाली तर मी कोणाच्या दारी जाऊ ? खरोखर बेगम रशीदाबानू फार शहाणी. ती नेमकं उमजायचं ते उमजली आणि परत गेली. ( थबकून स्मित करीत— ) तात्पर्य, जगदीश...या गानविद्येच्या महासागरात डोळे दिपवणारी असंख्य रत्न आहेत. अरे पण ती सगळीच काही आपल्या गळ्यासाठी नाहीत. आपल्या गळ्याला शोभेल, असं एखादं रत्न आपण उचलावं आणि कसलीही खंत न ठेवता, इतरांच्या गळ्यातील रत्नांचं लावण्य फक्त दुरून पाहून तृप्त व्हावं.

**जगदीश :** माफ करा दादा पण तुम्ही सांगता हे जर खरं असेल तर ह्यातभर तुम्ही अनेक घराण्यांची गाणी कशासाठी शिकलात ? घराणेदार गायकी तर सोडाच पण आता तुम्ही जे गायलात त्यावरून गानभरी लोकांच्या गीतगायनाचाही तुम्ही कधीकाळी कसून अभ्यास केला असला पाहिजे.

**बुवा :** अरे बेटा, मला माझी गायनविद्याच नव्हे तर गायनविद्येतलं अवघं शहाणपणदेखील चाचपडत, ठेचकाळत, जबरदस्त फटके खात मिळवावं लागलंय, खूप उमेदीची वर्षं वाया गेली त्या शहाणपणापायी. ते मिळवण्यासाठी तुलासुद्धा तसंच चाचपडत, ठेचकाळत, उमेदीची वर्षं वाया घालवायची आहेत का ?

**जगदीश :** दादा—( क्षणार्ध थबकून ) तुम्हाला दुखवणं मला जिवावर येतं. पण ज्या गायकीवरचा माझा जीवच उडालाय ती केवळ मी तुमचा गंडा बांधलाय म्हणून घोटत बसणार नाही.

**बुवा :** जगदीश, तुझा जीव जडला असला तरी गानभरी लोक तुला आपली विद्या देणार नाहीत...कधीही देणार नाहीत.

**जगदीश :** दादा, त्यांची गायकी समर्थपणे पेश करणाऱ्या एका गानभरी देवदासीशी मी लग्न करणार आहे.

**बुवा :** ते जंगली लोक प्राणापलीकडे आपल्या विद्येला जपतात ते आपल्यातील देवाला वाहिलेली मुलगी तुला सुखासुखी कधी तरी देतील ?

**जगदीश :** सुखासुखी नाही देणार कदाचित. पण प्रसंग पडलाच तर त्यांचा विरोध पत्करूनही मी रैनाशी लग्न केल्याशिवाय राहणार नाही.

**बुवा :** जगदीश....जगदीश....अरे माझा, ऋताचा, स्वतःचा आणि त्या अश्राप मुलीचा—सर्वांचा नाश करायचा ठरवला आहेस का तू ? अरे ते गानभरी पक्के रानटी, कडवे क्रूर आहेत. संख्येने शेकडो आहेत. तर एकटा...एकाकी तू कसा त्यांना तोंड देणार ? काही दैवी चमत्कार घडला तरच ती तुला मिळेल. एरवी—

**जगदीश :** ( चकारून ) दैवी चमत्कार—?

**बुवा :** एरवी एका रात्रीत तू आणि ती दोघेही नाहीसे व्हाल. तुम्हा दोघांचे नखदेखील दिसायचं नाही पुन्हा कधी जगाला. शहाणा असशील तर जगदीश, तू माझं म्हाताऱ्याचं ऐक. थोडं ऐक...अरे हा आत्मनाशाचा हट्ट सोड आणि—

**जगदीश :** ( स्वतःच्या तंद्रीतच ) दैवी चमत्कार. हे माझ्या आधीच लक्षात यायला हवं होतं. ठीक ठीक...अजूनही काही वेळ टळलेली नाही. मी एकटा एकाकी असलो आणि ते शेकडो, रानटी कडवे, क्रूर असले तरी....तरी माझ्या पाठीशी एक दैवी शक्ती उभी आहे.

**बुवा** ( दचकून ) तुझा विचार तरी काय आहे पोरा ?

**जगदीश :** ( खांद्याला लावलेल्या शबनम पिशवीतून शंखराज काढीत ) दादा, हा शंखराज मी तुम्हाला परत देण्यासाठी आणला होता—

**बुवा :** ( हात पुढे करून ) आण आण तो इकडे....

**जगदीश :** नाही. मला मंत्रबलाचा प्रत्यय घ्यायचाय.

**ऋता :** ( धावून त्याच्याशी झोंबत ) माझ्या गळ्याची शपथ आहे जगदीश. माझ्याशी लग्न नाही केलंस तरी चालेल पण विषाची परीक्षा पाहू नकोस...

**जगदीश :** ( शंखराज ओंजळीत घेत, तिला दूर ढकलीत ) दूर हो. जीवन-मरणाचा सवाल समोर उभा असताना दैवी शक्तीला आवाहन करायचं नाही तर मग केव्हा ? ( आकाशात पाहात ) मिळेल ते प्रायश्चित्त घ्यायला मी आनंदाने तयार आहे, पण शंखराज, रैनाशी माझा विवाह झालाच पाहिजे....

**ऋता :** ( किंचाळते ) नको....नको...जगदीश....

**बुवा :** ( आवेशाने धडपडत निघून जात ) अनर्थ...अनर्थ....आता सर्वनाश काही टळत नाही. मनू....रज्जू...

**ऋता :** ( गांगरून ) दादा दादा.... अरे कृष्णकान्त.... [ बुवांच्या मागे जाते. ]

[ याच वेळी चांदणे मावळते. आकाश भरारा काळ्या कभिन्न मेघांनी भरून येते. मेघगर्जना होते. वीज कडाडते आणि...

**कृष्णकान्त :** ( प्रवेशत ) काय झालं ? ऋताताई कुठं आहे ? जगदीश... जगदीश...

[ जवळ जाऊन तंद्रीत हरवलेल्या जगदीशला गदगदा हलवून जागे करीत ]

जगदीश अरे, झालं तरी काय ? बघता बघता चांदणं नाहीसं कसं झालं ? या दिवसात हे मेघ आले कुठून ? ही मेघगर्जना... हा विजांचा कल्लोळ, कसली अशुभ चिन्हं आहेत ही.... ?

**जगदीश :** ( हर्षभराने ) अरे वेड्या, ही अशुभ चिन्हं नव्हेत. शंखराजाच्या अमृतमयी वरदानाची ही साक्ष आहे. माझ्या विवाहाची ही नौबत आहे.

धन्य... धन्य शंखराज...
( हातातला शंखराज मस्तकी लावतो आणि आवेगात गाऊ लागतो.... )

**धन्य धन्य शंखराज राखीली तुम्हीच लाज ।**
**किमया घडली अगाध**
**गगनावर घुमती साद**
**गानभरी गीताचे सत्व कळे मजसी आज ।।**
**घन येवो भरभरुनी**
**प्रीत झरे रानीवनी**
**पानातुन प्रणयाचा श्रवणी येतसे रियाज ।।**

[ शंकरा रागातील हे उत्स्फूर्त गाणे जगदीश हर्षभराने गात आहे.... मेघगर्जना आणि विजांचा कल्लोळ चालू आहे. कृष्णकान्त अवाक होऊन बघतो आहे आणि त्याच वेळी.... पडदा ]

अंक पहिला समाप्त

म. ग्रं. सं. ग्रां. वाचनालय शाखा.
दा. क्र. १८८७७ दि. २०।८।८२
वि. नाटक क्र. ..................

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

[ काही दिवसांनंतरची गोष्ट. पडदा वर जातो त्या वेळी समोर दिसतो गहन अरण्याचा एक भाग. नदीच्या ऐल–तीरावरील कोणा आदिवासी दैवताचे एक पुरातन पण पडिक मंदिर. समोर एक उद्ध्वस्त जोते आणि समोरून जाणारी पायवाट. वेळ सायंकाळी मावळतीची.

पडदा वर जात असतानाच दूरवर अगदी दूर कोठे तरी...किंवा पाताळातून आल्यासारखी रैनाची आलापी. त्यापाठोपाठ रैना रैना...अशी जगदीशची हाक...त्यामागोमाग हाकेचा प्रतिध्वनी. रैनाचा आवाज एकदम लुप्त होतो. जगदीश पिसाटासारखा येतो—

**जगदीश :** ( थबकून ) खास इथंच...जवळपास इथंच कुठं तरी आवाज ऐकला मी तिचा की गेले काही दिवस, दिवस-रात्र मी जो वेड्यासारखा घळी, गुहा दऱ्या-खोऱ्यांतून भटकतोय, त्यामुळं मलाच भास व्हायला लागले आहेत ? काही कळत नाही. ( हातातल्या शंखराजाकडे पाहात शंखराज, अजून माझी सत्त्वपरीक्षा पुरी झाली नाही की आपल्या ठायी अद्भुत घडवण्याची शक्तीच उरली नाही ? ( गाऊ लागतो. )

> शक्ती सरता भक्ती नुरते कुठे जायचे दैवा
> अजाणता का अंत पाहसी सफल घडो ही सेवा
> विफल जाहले प्रयास अवघे जगणे होई व्यर्थ
> तुझ्या प्रसादे ईप्सित व्हावे पूर्ण मनीचे अर्थ

( गाणे संपल्यावर चाहूल घेत ) अरे पण हे काय ? ही मंडळी इकडे कोणीकडे ? माझाच शोध घेत तर आली नाहीत ? [ झटकन आडोशाला जातो. ]

[ क्षणार्धात बोलत प्रवेशतात विश्वनाथबुवा, कृष्णकान्त आणि दामोदर ]

**विश्वनाथबुवा :** इथंही नाही. बास, संपलं. पुरे झाला तो शोध कृष्णकान्त, जगदीश काही आता आपल्याला सापडणार नाही.

**कृष्णकान्त :** पण दादा—

**बुवा :** अरे पोरा या, गहन अरण्यातल्या सगळ्या सगळ्या वाटा आपण धुंडाळल्या. दिवसभर झाली एवढी पायपीट पुरे झाली नाही का ?

**दामोदर :** उन्हंदेखील कलली. घटकाभरात इथं गुडूप अंधार होईल. आपण बॅटरीदेखील बरोबर आणली नाही.

**बुवा :** नावाड्यानं नाव थांबवली तर रात्रभर इथंच मुक्काम करावा लागेल. चला पोरांनो, परतूया आपण. शंखराजानं काही अनर्थ घडवला नसेल तर आपल्या पायानं परत येईल तो.

**कृष्णकांत :** पण हा गेला कुठं ? दादा, जगदीशला सकाळीच तर मी या अरण्यात भटकताना पाहिला; मी त्याच्याशी दोन शब्द बोललोदेखील.

**दामोदर :** त्याच वेळी तू त्याला पुढं घालून घेऊन यायचंस.

**कृष्णकांत :** ऐक तर खरा....मी दोन शब्द बोललो असेन नसेन तेवढ्यात तिची आलापी ऐकू आली. तशी "रैना...रैना..." अशी हाक देत जगदीश बघता बघता गहन अरण्यात नाहीसा झाला.

**दामोदर :** हे गानभरी लोक जादूटोणा करतात असं ऐकलंय मी. त्या बयेनं त्याला मंत्रमुग्ध करून कडेकपारी नेलं नसलं म्हणजे—

**कृष्णकांत :** छे छे. दामोदर, काही तरीच तुझा तर्क. अरे हे गानभरी लोक तसे भोळेभाबडे आणि गरीब दिसतात.

**बुवा :** दिसतात....फक्त दिसतातच, कृष्णकांत. त्यांच्या वाटेला कोणी जात नाही तोवरच. पण आपल्या विद्येला वा मुलीला कोणी पळवणार आहे असा नुसता संशय आला तरी ते राक्षस कोणाची गय करीत नाहीत.

**कृष्णकांत :** अशा अफवा मीही ऐकल्या आहेत दादा. पण जगदीश तर सांगत होता की....

**बुवा :** जगदीश मूर्ख आहे. त्यानं गानभरींची दुनिया काय पाहिलीय ! अरे मी त्यांच्यात राहिलोय. थोडीथोडकी वर्षं नव्हेत तर...

**दामोदर :** ( थक्क होत ) दादा तुम्ही ? गानभरी लोकांच्या टोळीत ?

**बुवा :** ( चपापून सावध होत ) ते विसरा सगळं. तुम्हाला मी आज ज्या ज्या वाटेनं नेलं आणि ज्या ज्या जागा दाखवल्या त्यावरून तुमच्या लक्षात यायला हवं होतं की... ( थबकत ) चला, जाऊ या आपण.

[ बुवा त्या दोघांना ओढून घेऊन जाऊ लागतात तोच आडोशामागून बाहेर येत जगदीश... ]

**जगदीश :** थांबा दादा. [ सगळेच दचकून थबकतात. "अरे जगदीश ! तू !" असे ओरडत दामोदर आणि कृष्णकान्त त्याच्याजवळ धावतात तशी....] दादा, तुम्ही गानभरींच्या टोळीत राहिलाय म्हणता तर रैना कुठं असेल त्याचा ठावठिकाणा सांगा मला आणि मग जा.

**बुवा :** जगदीश बेटा, तुला काय हवंय ? रैना की तिचं गाणं ?

**जगदीश :** मी माझ्या प्राणांचीदेखील बाजी लावलीय यावरून तुमच्या लक्षात यायला हवं दादा, माझ्या दृष्टीनं रैना आणि तिचं गाणं या दोन्ही गोष्टी वेगवेगळ्या नाहीत.

**बुवा :** कला हे एक उग्र दैवत आहे बेटा... स्त्रीच्या मोहाशी कलेची गल्लत करू नकोस. गानभरींची गायकी मी तुला शिकवायला तयार आहे.

**जगदीश :** त्यापेक्षा मला रैना कुठं सापडेल ते सांगाल तर उपकार होतील.

**बुवा :** मी कशाला तुझ्या नाशाला धनी होऊ ? शंखराजाला तू मागणं मागितलं आहेसच. तोच तुला...

**जगदीश :** ( शंख फेकत ) घेऊन चला तुमचा शंख. वाळूत सापडणाऱ्या शेकडो शंखांपेक्षा त्याची ताकद काही वेगळी नाही.

**बुवा :** ( शंख उचलीत ) अरे अरे बाळा, तू हे काय केलंस ? ( गातात ).

**अघटीत घडले करुणाकार**
**वरदानची हो विफल कसे**
**अंधासी का दोन लोचने मज गमते हे दान असे**
**शंख नसे ही रौद्र योजना**
**विधीची न्यारी रीत खरी**
**जोगिणीस की अलंकार हा तुज जगदीशा वदत असे**

( गाणे संपता संपताच रैनाची आलापी ऐकू येते. ती ऐकून जगदीश भारल्यासारखा धावत जातो. नाहीसा होतो.

**कृष्णकान्त :** चला दादा... परत जाऊ या आपण.

**दामोदर :** होय दादा. जगदीश आपल्याबरोबर पुन्हा परत येईलसं मला वाटत नाही.

**बुवा :** ( प्रक्षोभाने ओरडून ) हे गाणं नाही...हे गाणं नाही भैरवबाबा, ऐकून ठेव...ही भुलभुलय्या आहे....हा जादूटोणा आहे...हा मोहिनीमंत्र आहे. हे गाणं नाही.... नाही.... त्रिवार नाही ! ( शंखराजाकडे पाहात मटकन बसत ) पाहा पाहा... दामोदर, कृष्णकान्त, अरे हा शंखराज चूड लावून पुन्हा माझ्या पायाशी परत आला. अवलिया... सद्गुरो... आणिक काय दाखवायचं योजलंय आपण ?

**दामोदर :** चला दादा अंधार व्हायला लागला.

**कृष्णकांत :** नाव बंद होण्यापूर्वी परतायला हवं आपण. ( शंखराज उचलण्यासाठी वाकतो तशी—)

**बुवा :** थांब. हात लावू नकोस त्याला. मागेल ती इच्छा पुरी करतो एवढ्यावर

तुम्ही तरी भाळून जाऊ नका. पडू दे तो तिथंच. चला जाऊ या आपण.

[ सगळे जातात. चन्द्रोदय. स्वच्छ चांदणे. भैरवबाबा येतो. शंखराज उचलीत— 'मागेल ती इच्छा पुरी करतो ?... तर मग हा शंखराज माझ्यापाशीच हवा.' असे उद्‌गारतो. तेवढ्यात रैनाची आलापी. 'रैना.... रैना....' अशी जवळ-पासच घातलेली जगदीशची हाक. भैरवबाबा लगबगीने शंखराज घेऊन जातो. क्षणभरात 'रैना... रैना...' अशी हाक मारीत जगदीश येतो. हताशपणे जोत्यावर बसतो. तोच रैना आलाप घेत येते. जवळ येते तशी—)

**जगदीश** : (दचकून) रैना ? तू ? की भास ? पुन्हा एकदा भास ?

**रैना** : (जवळ जात त्याला स्पर्श करीत) हा स्पर्श म्हणजे तर भास नव्हे ?

**जगदीश** : (तिचा हात पकडीत आवेगाने) रैना...रैना ! कुठं होतीस तू ?

**रैना** : इथंच तर होते. सारखी तुला साद घालीत होते.

**जगदीश** : अग तुला शोधण्यासाठी गेले दोन तीन दिवस मी रानोमाळ भटक-तोय. या सगळ्या अरण्याचा अगदी कानाकोपरादेखील—

**रैना** : अरे जगदीश, मी होते जमिनीखाली, भुयारात. या वृक्षाच्या मागं जे विवर आहे तीच वाट आहे या भुयाराची.

**जगदीश** : भुयारात ? म्हणजे रैना, भैरवबाबानं तुला भुयारात बंदिवान करून ठेवलं होतं ?

**रैना** : होय.

**जगदीश** : तुझा छळ केला त्यांनी ? उपाशीतापाशी ठेवलं ? मारहाण केली ?

**रैना** : नाही, नाही, नाही. तसं काहीएक केलं नाही त्यानी. उलट मी माझा हट्ट सोडावा यासाठी खूप आर्जवं, अगदी मनधरणी केली भैरवबाबानं माझी. सगळे गानभरी भडकून उठले होते. कदाचित त्यानी मला ठारदेखील मारलं असतं. पण भैरवबाबानं त्यांना परतून लावलं. मला कोणी अपाय करू नये म्हणूनच भैरवबाबानं मला या भुयारात कोंडून घातलं होतं.

**जगदीश** : मग तू सुटलीस कशी ?

**रैना** : त्याचाच मला चमत्कार वाटतोय.

**जगदीश** : (विस्मयाने) चमत्कार ?

**रैना** : अरे कालपासून सगळ्या गानभरींची वागणूक बदलली. भैरवबाबाची तर भाषाच बदलली.

**जगदीश** : बदलली म्हणजे ?

**रैना** : खरं खोटं गानेश्वर जाणे. पण सगळ्या गानभरींचा विरोध मावळला. तुझा हट्टच असेल तर जगदीशशी तुझं लग्न लावून देतो असं भैरवबाबाही म्हणायला लागला. त्या सगळ्यांचं मनच पालटलंय की त्यांनी काही वेगळाच डाव योजलाय,

मला कळत नाही, जगदीश.

**जगदीश :** डाव योजायचं काय कारण ? तुला घेऊन सगळे गानभरी फरारी झाले असते तरी मी काय करणार होतो त्यांचं—?

**रैना :** मग काय हा चमत्कार म्हणायचा ?

**जगदीश :** होय रैना, हा चमत्कारच घडला आहे. मंतरलेल्या शंखराजाजवळ मी जे मागणं मागितलं त्याची पूर्ती होते आहे. खचित, खचित. शंखराजाच्या शक्तीचा हा प्रभाव आहे. ( हात जोडून ) धन्य धन्य शंखराज. आपल्या शक्तीबद्दल मी अविश्वास दर्शविला— मला क्षमा करा. आता वाट्याला येईल ती दुर्घटना पत्करायला मी तयार आहे.

**रैना :** ( विस्मयाने ) तू हे काय बोलतो आहेस जगदीश ?

**जगदीश :** हे सगळं विसरून जा रैना. अगोदर आपण नदी ओलांडून सोमेश्वराच्या मंदिरात जाऊ आणि तात्काळ विवाहबद्ध होऊ.

**रैना :** नाही, जगदीश—

**जगदीश :** तुला कळत कसं नाही रैना, अग आपला विवाह झाल्याखेरीज गानभरींच्यापासून मी तुला कसलंही संरक्षण देऊ शकणार नाही.

**रैना :** नाही जगदीश—भैरवबाबाची एक शर्त मी मानली आहे.

**जगदीश :** कोणती शर्त ? आणि का म्हणून तू मानलीस ती शर्त ?

**रैना :** चिडू नकोस...रागावू नकोस रे जगदीश... गानभरींच्या रीतीनं माझा विवाहसोहळा व्हावा, अशी बापानं शर्त घातली तर त्यात वावगं काय आहे रे ?

**जगदीश :** तुला काय म्हणायचंय रैना—!

**रैना :** अरे भैरवबाबा म्हणाला—

[ तेवढ्यात दोन-चार भालाईत गानभरींच्या समवेत भैरवबाबा येतो. आणि— ]

**भैरवबाबा :** थांब रैना. मी सांगतो.

**रैना :** ( घाबरून जगदीशला पाठीशी घालीत ) भैरवबाबा, जगदीशच्या जिवाला काही अपाय होईल तर—

**भैरवबाबा :** मूर्ख पोरी, तुझ्या लग्नाची बोलणी करायला मी आलोय. गानेश्वराची शपथ घेऊन मी तुला शब्द दिलाय तसा (तिला हाताने दूर करीत) बाजूला हो.

**जगदीश :** ( त्याला निवारीत रैनाला पाठीशी घालीत ) लग्नाची बोलणी करण्याची ही रीत नव्हे भैरवबाबा. मला ठार मारल्याशिवाय हिच्या अंगाला हात लावू देणार नाही मी कोणाला.

[ बरोबर आणलेले गानभरी भालाईत भाले उगारतात. तशी हात वर करून भैरवबाबा त्यांना इशारत करतो. भाले खाली होतात. मग— ]

**भैरवबाबा :** ( त्याला न्याहाळीत ) अरे पिल्ला, तू तर अगदीच अजाण भोळा-भाबडा दिसतोस. तुझ्या गुरूसारखा दिसत नाहीस ?

**जगदीश :** माझ्या गुरूसारखा ? म्हणजे काय भैरवबाबा ?

**भैरवबाबा :** (छद्मीपणाने हसत ) म्हणजे लबाड, निमकहराम आणि चोर.

**जगदीश :** (अंगावर धावून जाऊ पाहात–) भैरवबाबा––

[ भालाईत त्याला रोखतात तशी––]

**भैरवबाबा :** संभाळून. सच्चाही दिसतोस.

**जगदीश :** ( धुमसत ) दादांनी काय अपराध केला होता तुमचा ?

**भैरवबाबा :** ते कधी खुल्या दिलानं सांगितलं नाही वाटतं त्यानं तुम्हा शिष्यांना ? खराब, एकदम खराब नेकीचा माणूस आहे तो. अरे एके काळी हा तुमचा दादा, लबाडीनं वेशांतर करून एक गानभरी म्हणून आमच्यात राहिला, आमचं अन्न खाल्लं, आमची गायनविद्या चोरून शिकला––

**जगदीश :** भैरवबाबा, विद्येची कधी चोरी होत नाही. तुमच्यासारखे कद्रू लोकच गाणं चोरून ठेवतात म्हणून––

**रैना :** थांब जगदीश. भैरवबाबा, त्या सगळया जुन्या गोष्टी आज उकरून काढायची काही गरज आहे का ? पंडितजींनी तुमचा गुन्हा केला, तसं तुम्हीही त्यांना कडक शासन केलंत. तिथंच ते ते सगळं संपलं.

**भैरवबाबा :** तसं आणि तेवढ्यानं संपलं नाही बेटी. दुनिया हिंडत फिरत इतक्या वर्षांनी आम्ही इथं आलो तर या वेळी पुन्हा हा प्रकार.

**जगदीश :** भैरवबाबा, तुम्ही आमच्या लग्नाला संमती दिली आहेत असं––

**भैरवबाबा :** होय, होय पोरा. सृष्टीच पालटली आहे तेव्हा संमती देणं मला भाग पडलंय. पण पिल्ला, जे आजवर कधी या गानभरी दुनियेत घडलं नाही ते घडणार आहे. रैनाशी तुझं लग्न इथंच, आमच्या रीतिरिवाजानं होईल.

**जगदीश :** कबूल आहे बाबा. रैनासाठी तुमची शर्त मी मानली आहे.

**भैरवबाबा :** गफलत करू नकोस पोरा, हुरळून जाऊ नकोस. मला तर तुमची गत फार फार कठीण दिसते. रैना ही आमच्या गानेश्वराला वाहिलेली पोर. अरे गानेश्वराची ती राणी–म्हणून अवघे गानभरी तिला मानतात. गानेश्वराची राणी तू मागतो आहेस....विचार कर.

**जगदीश :** तसल्या खुळचट कल्पनांवर तुम्हा लोकांची श्रद्धा असली तरी मी विश्वास ठेवायला तयार नाही भैरवबाबा.

**भैरवबाबा :** असल्याच मस्तीपायी तुझ्या उस्तादाला धाईधाई रडावं लागलं. तो आणि त्याची बायको टाचा घासून तडफडली त्या वेळी.

**जगदीश :** पण म्हणजे नेमकं काय घडलं त्या वेळी ?

**भैरवबाबा :** ते तुझ्या गुरूलाच जाऊन विचार. तुम्हा दोघांनाही बजावणं माझं काम आहे. गानेश्वराला वाहिलेली मुलगी म्हणजे गानेश्वराची राणी. तिच्या नजरेला नजर देऊन बघणंदेखील पाप मानतो आम्ही गानभरी. आणि तुम्ही तर दोघंही उद्दामपणे नवराबायको व्हायला बघता आहात. गानेश्वराचा कोप झाला तर दोघेही बरबाद व्हाल, फेरविचार करा.

**जगदीश :** भैरवबाबा, पुढं काय होईल त्याची चिंता मी करीत नाही.

**भैरवबाबा :** रैना, तुझा काय विचार आहे ?

**रैना :** भैरवबाबा तुला ठाऊक आहे, गानेश्वरानं मला कौल दिलाय.

**भैरवबाबा :** कौल दिलाय एवढ्यावर जाऊ नकोस. गानेश्वर मोठा लहरी राजा. त्याची मर्जी केव्हा फिरेल त्याचा नेम नाही. गानेश्वर आपल्या राणीला सुखासुखी सरळपणानं सोडत नाही.

**रैना :** भैरवबाबा, एकदा माझा निश्चय झाला तो झाला.

**भैरवबाबा :** ठीक ठीक....चला तर गानभरी हो, तळावर नौबत झडू द्या.... उद्या रात्री गानेश्वराची महापूजा आणि गानभरींचा महोत्सव. गानेश्वराची राणी दुसरा घरोबा करते आहे. तिच्या इतमामाला साजेशी पाठवणीची तयारी करा. नौबत झडू द्या. गानभरी हो, नौबत झडू द्या.

[ "नौबत झडू द्या, गानभरी हो नौबत झडू द्या" ही ललकारी देत सगळ्या गानभरी समवेत भैरवबाबा निघून जातो. दूरवर ही ललकारी पुनः पुन्हा निरनिराळ्या आवाजात दिलेली ऐकू येते. त्यातच नौबत झडू लागते. अंधार होतो. मागे पूर्णचन्द्र दिसू लागतो. गानभरींचे एक समूहगीत कानी येते—अस्पष्टपणे...]

(गानभरींचा कोरस....)

**झिम्माड झिंगा रं झिम्माड झिंगा**
**पोरीले पिंगा**
**अवखळ दंगा उभार गं**
**डौलात ग पोरी डौलात गं**
**अशी झोकात करतीया पुकार गं**
**...सखीया विरही मी सजणाची**
**याद छळे मदनाची**
**सखीया, घायल करितो सावन**
**कुणी भेटवा साजण**
**आम्ही गानभरी**

होतो रानभरी
रंगा पेटुन उठलाय वणवा
रात गुंफुन या
हात...जुंपुन या
धुंद होऊन पिऊन चांदवा

**रैना :** मला अजून एका गोष्टीचं आश्चर्य वाटतंय जगदीश.

**जगदीश :** भैरवबाबानं आपल्या लग्नाला संमती दिली कशी– हेच ना !

**रैना :** तेवढंच नाही. सगळया गानभरींनी त्याला होय कसं म्हटलं ? तुला ठाऊक नाही जगदीश, अशाच देवाला वाहिलेल्या एका तरूण मुलीनं पळून जाऊन एका गानभरीशी चोरून लग्न लावलं तर—( अंग शहारून थबकते )

**जगदीश :** तर काय झालं ? सांग ना ?

**रैना :** गानभरींनी त्या दोघांना पकडून आणलं आणि...( थबकते )

**जगदीश :** त्यांना ठार मारलं !

**रैना :** कसं मारलं ठाऊक आहे ? घोड्याच्या रिकीबीत पाय अडकवून उलटं जमिनीवर पाडलं आणि खाचखळग्यातून घोडा रानोमाळ दौडत नेला. ( घाबरून त्याला बिलगत ) नाही जगदीश...असलं काही होण्यापेक्षा—

**जगदीश :** किती वेडी आहेस तू रैना ? आपल्या बाबतीत असं काहीएक घडणार नाही.

**रैना :** होय होय. आपण काही पळून जाऊन चोरून लग्न लावायला निघालो नाही की तू गानभरींच्यापैकी एक नाहीस.

**जगदीश :** तेवढंच नाही रैना. आपल्या दोघांच्या पाठीशी शंखराजाचं मंत्रबळ आहे. आपलं लग्न होणार आणि कोणीही आपल्याला कसलाही अपाय करणार नाही. तेवढी त्यांची हिंमत नाही.

**रैना :** मघापासून तू हे काय सांगतो आहेस जगदीश ? कसला शंखराज ? कोणतं मंत्रबळ ?

**जगदीश :** माझ्या गुरूनं दिलेली एक अद्‌भुत दैवी शक्ती होती हा शंखराज म्हणजे. हातात घेऊन मागावं ते मिळतं म्हणे...नाही ते सत्यच आहे. मी करंटा माणूस म्हणून वाट बघण्याइतकाही मला धीर निघाला नाही.

**रैना :** ( विस्मयाने ) म्हणजे ? म्हणजे तू काय केलंस जगदीश ?

**जगदीश :** सांगायलाही मला शरम वाटते. मागणं मागूनही तू मला मिळाली नाहीस....दिसली नाहीस तेव्हा तो शंखराज दादांच्या अंगावर मी फेकून दिला.

**रैना :** फेकून दिलास ? तुझे दादा परत घेऊन गेले ?

**जगदीश :** होय. आणि त्या पाठोपाठच्च तू मला भेटलीस. भैरवबाबाही भेटला आपलं लग्न ठरलं. सहजपणं, सुरळीतपणं, ठरलं. रैना, खचित हा त्या शंखराजाच्या मंत्रशक्तीचा प्रभाव आहे.

**रैना :** पण जगदीश शंखराज तू फेकून दिलास. देवाचा कोप तर होणार नाही ना आपल्यावर ? काही वेडंवाकडं तर घडणार नाही ?

**जगदीश :** घडलं तरी त्याची मला तमा नाही रैना. अग थोडंसं जगावं पण वादळ-वाऱ्यासारखं चराचराला घुमवीत जगावं. धबधब्यासारखं कोसळून जाणारं जिवंतपण असावं पण गलितगात्र डोहासारखं मेलेलं जिणं नसावं. कडाडकडाड कोसळणाऱ्या विजेसारखं आयुष्य असावं, पण मिणमिणत्या फडफडणाऱ्या ज्योती-सारखं नसावं.

रैना, याद येते तानसेनची
पेटविल्या त्याने दीपज्योती गाऊन दीप राग
आणि अंगाअंगातून फुटत राहिली आग आग
प्रियशिष्या पत्नीने गाताच मेघमल्हार
पावसात भिजून गेला देह अपरंपार
रैना गानभरी स्वप्न हे
उरात माझ्या दडून आहे.

**रैना :** पुरुषासारखं बोललास जरी
माझे स्वप्न ऐकशील तरी ?

**जगदीश :** रैना, चुकलंच माझं.
बोल तुला काय हवं ?

**रैना :** राजा, माझे सुंदर स्वप्न नवे ।
घरटे बांधुन दोघांसाठी
घास चिमुकला दोघे सेवू
तुलाही भरवीन मीही खाईन
तुझ्या घट्टशा मिठीत राजा झोपी जाइन
तनही अवघे, मनही अवघे
तुला वाहिले, तुला पाहिले
डोळ्यांमधुनी तुझ्या सख्या रे स्वप्नच बनुनी मीही राहिले

**जगदीश :** रैना रैना, देहच्च अवघा तुझ्याच्च स्वाधीन
ह्या ओठांनी टिपून घेईन
तव ओठांची मखमल ओली
ढगाआडुनी लुकलुकणारी एक चांदणी तुला पाहता हळु लाजली

**रैना :** आपुले मीलन रुजुन जावे
ह्या उदरातच तुझ्या प्रीतीचे फूल फुलावे
**जगदीश :** रैना रैना बघ ना पुरता बंदिवान मी
तुझ्या दर्शना आतुर सावन, आतुर तनमन
अपुले मीलन बघताना हा चंद्र आभाळी भिजून जावा
(मिठीत घेतो.)
**रैना :** हां हां ! राजा ! लग्नानंतर फुलावयाचे स्वप्न असे हे
आताच सारी रात जागणे बरे नव्हे
**जगदीश :** हेच हेच ह्या स्त्री जातीचे सदैव चुकते
अशा सुगंधी सुखक्षणांना पुरुषजातही नेहमी मुकते.
(रागावून जोत्यावर बसतो.)
**रैना :** रुसला राजा । धीर धरावा अजून थोडा
**जगदीश :** मीही वेडा
**रैना :** कसे सांगु रे । सोसावी कळ
**जगदीश :** इतुके नाही थांबायाला मजपाशी बळ
पेला भरुनी वाहुन जाता घोटही घ्यावा
धुंद शर्वरी चांद जरासा पिऊन घ्यावा
तू जवळी अन् प्रहर मोकळा निघून जावा ?
**रैना :** कसे तुला रे सांगू राजा
तुला वाटते आपण दोघे इथे एकटे ?
**जगदीश :** तसेच वाटे
**रैना :** नाही साजणा
सहस्र नजरांचेही पहारे अवती भवती
**जगदीश :** मला न दिसती
**रैना :** कितीक डोळे रोखुन बघती
फुलाफुलांतुन मिस्किल हासू
पानामधुनी चाले गपसप
त्यांच्यामधुनी कसा फुलावा प्रणय प्रियकरा
**जगदीश :** उन्मादातच घडते सारे विसर जगाला विसर पसारा
**रैना :** तू सोसाटुन वाजत येता मी उमलावे हेही खरे ना
तू फेसाळुन धावत येता मीही भिजावे हेही खरे ना ?
तू ओसंडुन वाहुन जाता तुला मी प्यावे हेही खरे ना ?
पण हे अवघे दोघांसाठी। दोघांपुरते। हेही खरे ना ?

**जगदीश** : तुझ्यासमोरी माझं वदणे कुठे न उरते।
चतुर अशी तू हेही खरे ना–?
**रैना** : (हसून) रुसला राजा। वाट काढते मी काट्यांतुन
जिच्या शेवटी फुलले आहे दोघांसाठी रे नंदनवन
सांग राजसा आज कोणते गीत तुझ्यासाठी मी गाऊ
**जगदीश** : तर मग रैना। गाशील गाणे ते?
**रैना** : कोणते?
**जगदीश** : जे मज आवडते
**रैना** : ते? स्मरते नच पुरते?
कुठुनशा येती त्या ओळी पाताळातुन। याद येतसे गतजन्मीची
**जगदीश** : की कुणाची?
**रैना** : त्या गाण्यातुन गानभरी मज दिसतच नाही
असे अचानक वैरी झाले तेही गाणे
कधि गुणगुणता भैरवबाबा येतो धावुन
म्हणतो रैना। गानभरी तू। हेच नसे गे तुझेही जीवन
**जगदीश** : तर मग रैना! आजपासुनी आत्तापासून विसर गानभरी नाती सारी पिसाट होऊन, कण कण फुलवुन ह्या देहाचा.
खुशाल गा तू खुशाल गा...
[रैना आलापी घेत त्या गीताच्या पहिल्या ओळी गाऊ लागते. तोच भैरवबाबा कोठूनसा "नाही नाही रैना....नाही" असा पिसाळून गर्जना करीत येतो. रैना थांबते, तशी—]
भैरवबाबा, मी सांगितलंय तिला म्हणून—
**भैरवबाबा** : नाही–नाही कदापि नाही. हे गीत गानभरीचं नाही.
**जगदीश** : गानभरीचं नाही तर दुसऱ्या कोणाचं असणार?
**भैरवबाबा** : तुझ्या त्या पाखंडी गुरूला जाऊन विचार.
**जगदीश** : त्यांचा काय संबंध या गीताशी?
**भैरवबाबा** : ते मी जाणत नाही. पण हे गीत गानभरीचं नाही आणि म्हणूनच रैनाला ते गानभरीच्या तळावर गाता येणार नाही.
**जगदीश** : हा तळ म्हणजे तुम्हा गानभरींच्या मालकीचं अरण्य नव्हे— भैरवबाबा.
**भैरवबाबा** : गानभरी जेथे तळ ठेवतात तेवढ्यापुरता तो भाग गानभरींच्याच सत्तेखाली असतो पिल्ला. उद्या रात्री महापूजा आणि महोत्सव आटोपून तुमचं लग्न लावून गानभरी हे अरण्य सोडतील. पुन्हा कधी कधीही या भूमीवर पाय

ठेवणार नाहीत. त्यानंतर तुम्ही हवे तिकडं जा आणि हवं ते गा. पण आज नाही.

**जगदीश :** ठीक आहे. रैना, उद्याच्या रात्रीला काही फार अवधी राहिलेला नाही. तोवर गा.... काहीही गा...

**रैना :** काय गाऊ जगदीश ?

**जगदीश :** ( गातो ) छत आकाशाचं आपुल्या घराला...

[ रैना आणि जगदीश दोघेही हे गीत उन्मादात परस्परांचे हात धरून गाऊ लागतात. भैरवबाबा नाहीसा होतो. हे गीत रंगले असतानाच अंधार—आणि]

**प्रवेश पहिला समाप्त**

## प्रवेश दुसरा

[ रंगमंच प्रकाशाने उजळतो तेव्हा पहिल्या प्रवेशातीलच अरण्याचा भाग दिसतो. उद्ध्वस्त जोत्यावर महापूजा केलेली गानेश्वराची ओबडधोबड मूर्तीची स्थापना केलेली दिसते, वीणा घेतलेली सरस्वती आणि अर्धनारीनटेश्वर यांच्या मिश्रणातून गानेश्वराचे दैवत तयार झाले असावे. मूर्तीच्याजवळ एक आदिवासी पुजारी मूर्तीला पाने फुले वाहात बसलेला दिसतो. त्यापुढे जोत्यावर दोन वृक्षांच्या बुंध्यांची केलेली आसने मांडली आहेत. देवापुढे आदिवासी गानभरी तरूण स्त्री-पुरुषांचे गीत आणि नृत्य चालले आहे. डफ ढोलकीसारखे वाद्य कोणी एक धुंदीत वाजवतो आहे. तो ताल पकडून फेर धरून नाचत बाकीचे स्त्री-पुरुष गात आहेत. गाणे संपण्याच्या सुमारास श्रृंगारसाज केलेल्या वधूवरांना दोन्ही बाजूला हाताला धरून घेऊन भैरवबाबा प्रवेशतो. भैरवबाबा देवाला साष्टांग लोटांगण घालून वंदन करतो. रैना तसेच करते. जगदीश मात्र फक्त वाकून नमस्कार करतो. भैरवबाबाशी जगदीशची काही बाचाबाची होते हे हातवाऱ्यावरून आणि आविर्भावावरून लक्षात येते. रैना मध्यस्थी करते. अखेर तिच्यासाठी तो साष्टांग प्रणिपात करतो. मग दोघांना भैरवबाबा त्या दोन आसनांवर बसवतो. गानभरी आदिवासी दुसऱ्या प्रकारच्या तालावर नाच करीत आणखी एक गीत गातात. या नृत्यात भैरवबाबाही सामील होतो.

**चाल ग सुंदर, मना हाऊ भर्तार, वाजति गाजति येही**
**( माझा हा )**
**नदी ना काठे, मांडव तठे, नवरदेव परणाले जाही**

बंदडी खुले, चितांग झुले, पंगात बसनी मयामा
कलोऱ्या चतुर, मंडोली फितुर, लाजंन दरवतीस डोयामा
वलीज हयदी, लावतीस जाती, परनाले जाही गानभरले
चंद्राले खयामा, नाचस पयामा, बल्लाव तुमी भरतारले
सजणी, मन्हं काळीज तुना जाहीजो
डोई बांसननी, चतुर कलोरी
वाजत गाजत हाठे आनलायजो
वरात निघनी, गुंगल रातनी
जीवामा, प्राणमा तूच बोलसजो
तेज हयदीज अधीर बंदडी ( नवरी )
डोयामा, गयामा, साज सोभनाजो
नाव लेवाले, मना जीव लाजंस
गालावर, वठवर, नाव लिख जायजो

हे नृत्यगीत संपल्यावर सगळे गानभरी दुतर्फा बसतात. भैरवबाबा जगदीश आणि रैना यांना दोन्ही बाजूंना गानभरींच्यात समोरासमोर तोंड करून बसवतो. अखेर गानेश्वराचा पुजारी म्हणतो—" भैरवबाबा, गानेश्वरराजा शांत झाला. मध्यरात्र टळून गेली. आता उशीर कशासाठी—?"
भैरवबाबा उठत म्हणतो—" छे छे उशीर मुळीच नाही. रैना ऊठ बेटी. ऊठ जगदीश...या असे गानेश्वरासमोर या...एकमेकांचे दोन्ही हात हातात घ्या."
जगदीश आणि रैना एकमेकांचे दोन्ही हात हातात घेतात. पुजारी आणि भैरवबाबा पानांच्या माळांनी त्यांचे धरलेले हात बांधतात. त्याच वेळी सगळे गानभरी पुन्हा फेर धरून नाचत समूहगीत गातात. आणि नाचत नाचत दोन्ही बाजूंनी निघून जातात. त्यांच्या समवेतच पुजारीही निघून जातो. उरतात फक्त जगदीश, रैना आणि भैरवबाबा. तशी—]

**जगदीश :** भैरवबाबा, आमचे बांधलेले हात तर मोकळे कराल ?

**भैरवबाबा :** राहू देत काही वेळ. तुमचे तुम्हालाही सोडवता येतील. पानांच्या माळा म्हणजे दोरखंड नव्हे.

**रैना :** ( खट्याळपणे ) बरा जखडला आहेस माझ्याशी— राहा असाच.

**जगदीश :** ( हसत ) अग जखडली गेली आहेस ती तू. मी नव्हे.

**भैरवबाबा :** शब्द दिला होता त्याप्रमाणे मी तुमचं लग्न लावून दिलं. रैना तू गानभरी कधीच नव्हतीस. आता तर गानेश्वराची राणीही राहिलेली नाहीस.

**रैना :** मी गानभरी कधीच नव्हते ? मग मी कोण होते ?

**भैरवबाबा :** अशीच एक रस्त्यावरून उचलून आणलेली पोर.
**रैना :** भैरवबाबा, तू हे काय सांगतोस ? मी तुझी मुलगी नव्हे ?
**भैरवबाबा :** मूर्ख बेटी, कोणा गानभरीनं आपल्या रक्ताची पोर गानेश्वराला वाहिलेली आजवर तू कधी पाहिली आहेस ?
**रैना :** न...नाही...पण माझे आई-बाप—
**भैरवबाबा :** ते तुला कधी कधीही कळणार नाहीत. कोठेही सापडणार नाहीत.
**जगदीश :** पण मग हे आज तरी या घटकेला आम्हाला कशासाठी सांगितलं ?
**भैरवबाबा :** आम्ही रानभरी कधी कोणाशी खोटेपणा करीत नाही. रैनाला घेऊन तू आज जाणार आहेस, पुन्हा आपली कधी गाठभेट होण्याचा प्रसंग येणार नाही, म्हणून तुला आणि तिला खरं काय ते सांगितलं.
**जगदीश :** भैरवबाबा, रैनावर प्रेम करतानाही मी कधी तिच्या जन्माची चौकशी केली नव्हती. त्यामुळे ती कोणाची मुलगी आहे हे कळल्यानं माझ्या दृष्टीत काहीही फरक पडणार नाही.
**भैरवबाबा :** फार उत्तम. आता मात्र या तळावर तुम्ही थांबू नका. ताबडतोप नदीपार व्हा. सगळेच गानभरी माझ्यासारखे दिलदार असतात असं समजू नका.
**जगदीश :** भैरवबाबा, इच्छा माझी पुरी झाली; आता मी कोणालाही आणि कशालाही भीत नाही.
**भैरवबाबा :** तुमचं रक्षण करायला आता शंखराजही तुमच्यापाशी नाही.
**जगदीश :** शंखराज ? तुला काय माहिती आहे शंखराजाची ?
**भैरवबाबा :** तुझ्या तोंडूनच काल मी ऐकलीय ती.
**जगदीश :** शहाणा असशील तर शंखराजाच्या वाटेला जाऊ नकोस भैरवबाबा.
**भैरवबाबा :** (कडुसरीचा शंखराज काढून दाखवीत) आता मी स्वामी आहे या शक्तीचा...तू नव्हेस की तुझा गुरू नव्हे (जाऊ लागतो तशी—)
**जगदीश :** थांब भैरवबाबा—अरे तुला कळलंय ते खरं नाही. निदान सगळं खरं नाही. हा शंखराज तुला कसा मिळाला ? तुला कोणी दिला ?
**भैरवबाबा :** तू स्वतःला संभाळ...नदीपार. ताबडतोब नदीपार व्हा. [ जातो. ]
**जगदीश :** (अस्वस्थपणे) रैना रैना, हा भैरवबाबा घात करणार.
**रैना :** (त्याला बिलगत) ते विसर रे जगदीश....मला मिठीत घेना.
**जगदीश :** त्याआधी हे हात कसे सोडवतात गानभरी नवरा बायको ते तर सांग.
**रैना :** अरे ते सुटत नसतात, तंतुपाश तोडायचे असतात दातांनी.
**जगदीश :** पण कोणी ? मी की तू ?
**रैना :** हे काय विचारतोस ? दोघांनी....एकदम....कसे माहीत आहे ? तंतू तर

तुटला पाहिजे...पण दात तर लागता कामा नये...

[रैना वाकते आणि एक तंतू अलगद् दातांनी तोडते आणि] जगदीश, आता तुझी पाळी.

[ तो वाकून दातांनी तंतू तोडू बघतो. पण जमत नाही, तशी रैना खळखळून हसू लागते. तो वाकून पुन्हा पुन्हा प्रयत्न करू लागतो....रैना हसत राहते... तेवढ्यात....

दोन गानभरी येतात आणि वाकलेल्या जगदीशच्या पाठीत खचाखचा खंजिराचे घाव घालतात. तो किंचाळी फोडतो. तीही " नाही...नाही " ओरडत किंचाळत त्याला पाठीशी घालू बघते. हात बांधलेले असल्याने त्याला प्रतिकारही करता येत नाही---बांधलेल्या हातासकट तो कोसळतो, ती....' भैरवबाबा....धाव रे धाव....भैरवबाबा....' म्हणून ओरडते. दोघे गानभरी पसार होतात. त्याच क्षणी भैरबाबा येतो— ]

**रैना :** ( दातांनी सगळे तंतू तोडत सोडवून घेत ) भैरवबाबा....त्या चांडाळांनी खंजिरानं भोसकलं रे याला....वाचव...मी पाया पडते तुझ्या. जगदीशला वाचव....( जगदीशला मिठीत घेत ) काय, काय झालं रे माझ्या राजा... जगदीश...जगदीश....

**भैरवबाबा :** ( त्याला पाहात ) हा गानेश्वराचा कोप !

**जगदीश :** ( वेदनांनी तळमळत ) नाही भैरवबाबा— हा शाप.... शंखराजाचा....

**रैना :** ( रडत ) भैरवबाबा, वाचव, त्याला वाचव, नाही तर मला तरी ठार मार...मला ठार मार....ठार मार रे....

[ भैरवबाबा मान हालवून ' नाही....नाही.... ' म्हणत असताना, जगदीश रक्तबंबाळ होऊन वेदनांनी हातपाय झाडत असतानाच—दूरवर गानभरींचे अस्पष्ट समूहगीत ऐकू येते आणि त्याच वेळी—पडदा. ]

अंक दुसरा समाप्त

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

[ काही महिन्यांचा काळ उलटला आहे. पहिल्या अंकात पाहिले होते तेच सोमेश्वर मंदिरापुढले पटांगण. वेळ सायंकाळची. सूर्य मावळतीची. बुवांच्या गाण्याच्या बैठकीची तयारी करण्यात कृष्णकान्त, दामोदर गुंतले आहेत. ऋता फरशीवर गालिचा मांडून त्यावर लोड तक्क्या वगैरे ठेवत आहे. कृष्णकान्त तंबोरा लावतोय. दामोदर हातोडीने तबला ठोकतो आहे. ]

**कृष्णकान्त** : तयारी तर आपण सगळी जय्यत केलीय, पण दामोदर, दादा खरोखरीच आज गायला बसतील इथं, असं वाटतं तुला ?

**दामोदर** : देव जाणे. मला तर ते आज इथं येतील असंही वाटत नाही.

**ऋता** : का ? दादांच्या शब्दावर तुमचा विश्वास उरला नाही ?

**कृष्णकान्त** : तसं नाही ऋताताई.... उगीच रागावू नकोस की गैरसमज करून घेऊ नकोस. गेल्या दोन तीन महिन्यांपासून दादांनी बैठकीतली गाणीच नव्हे तर रोजचा रियाझदेखील सोडलाय, म्हणून...

**दामोदर** : तेवढंच नाही कृष्णकान्त, आज इतक्या वर्षांत सोमेश्वराच्या मंदिरात अगदी अकल्पित, एकाएकी, सणासुदीशिवाय, अवघ्या एका दिवसाची पूर्वसूचना देऊन, दादांनी गाणं गायचं ठरवलेलं तू कधी पाहिलं आहेस ?

**कृष्णकान्त** : कधीच नाही. म्हणूनच दादांच्या मनात काय काय आहे ते काही कळत नाही.

**ऋता** : त्यात न कळण्यासारखं गहन गूढ काहीही नाही.

**दामोदर** : कृष्णकान्त, गेल्या दोन-अडीच महिन्यांत दादा किती खचल्यासारखे एकदम म्हातारे झाल्यासारखे वाटतात, नाही ?

**कृष्णकान्त** : दामोदर, म्हटलं तर दादा कबूल करणार नाहीत, पण.... जगदीशाचे हे अकस्मात नाहीसं होणं दादांनी मनाला फार फार लावून घेतलंय. अगदी जिव्हारी घाव घातल्यागत.

**ऋता** : त्याला आपण सगळे जबाबदार आहोत.

**कृष्णकान्त** : ( विस्मयाने ) ऋताताई, आपण सगळे ?

**ऋता** : होय. एका माईनं सगळं बळ पणाला लावून दादांना संभाळलंय.... सावरलंय.... पण एरवी सगळंच कठीण होतं.

**दामोदर** : पण आमच्याकडून काय चुकलं ऋताताई ?

**ऋता** : आता बोलले तर तुम्हांला राग येईल... पण " जगदीशचं काय झालं ते तरी मला कळू द्या " म्हणून तडफडत, तळमळत दादांनी दिवसरात्र एकच घोष चालवला होता. पुरुषासारखे पुरुष तुम्ही दोघे, दादांचे लाडके शिष्य... तुम्ही काय शोध केलात ?

**दामोदर** : ऋताताई, नदीपार जाऊन सगळं अरण्य मी शोधलं. गानभरींचा माणूस न् माणूस पाहिला. पण कोठेही त्याचा मागमूससुद्धा लागला नाही.

**कृष्णकांत** : दादाच नको म्हणाले म्हणून....नाही तर मी पोलिसातच वर्दी द्यायला निघालो होतो.

**ऋता** : आता ही सगळीच चर्चा निष्फळ आहे. माणसापरी माणूस गेला आणि आता दादांचं गाणंही संपणार.

**कृष्णकांत** : ( चकित होत ) गाणं संपणार, म्हणजे ?

**ऋता** : दादांनी आज हे इथं शेवटचं गायचं ठरवलंय.

**दामोदर** : छे छे...भलतंच काय ?

**ऋता** : दादा, जगदीशसाठी सोमेश्वराला सांकडं घालणार आहेत. तो सापडला तर ठीकच, नाही तर ही शेवटची बैठक.

**कृष्णकांत** : नाही नाही; ऋताताई...असं होता कामा नये...

**ऋता** : ते दादांना कोण सांगणार ? तुझी हिम्मत आहे ? माझी तरी नाही.

[ त्याच वेळी दूरवरून रैनाची व्यथित व्याकुळ सुरातली आलापी ऐकू येते तशी....]

**कृष्णकांत** : आली ती चेटकीण. तिचा आवाज ऐकला तरी तिच्या नरडीचा....

**ऋता** : पुरे. तुमचा पराक्रम कळला.

[ तोच लक्तरे झालेल्या दुल्हनच्या वेशातील वेडीपिशी रैना आलापी घेत येते. गळयात अडकवलेले स्वरमंडल आणि एक गानभरींचा कटोरा. ऋता तिच्याजवळ येते आणि रैनाच्या थिजलेल्या मुद्रेत निरखून पाहू लागते. ]

**ऋता** : ( तिच्या खांद्यावर हात ठेवीत मायेने ) कशामुळं ग बाई तुझी अशी अवस्था झालीय ?

[ रैना उन्मळल्यासारखी एक व्यथित व्याकूळ गीत घायल स्वरात गाते ]

**रैना** : व्याकुळ उपवन, व्याकुळ धरती, व्याकुळ मी तव दासी
राजसा, झाले रे वनवासी ॥
फिरले गोकुळ कृष्ण पाहिला
तुझ्याच साठी जन्म वाहिला
राधा विरही फिरते वणवण शोधु कुठे अवकाशी

मला नको ते गानभरी वन
खुडुन वाहिले तुजला जीवन
मिठीत तुझिया एकान्ताचे विश्वच हे आभासी—

[ सगळे मंत्रमुग्ध होऊन ऐकतात. गीत संपल्यावर. ]

**ऋता :** बाई, हे तुझं गाणं नव्हे. फत्तरालाही पाझर फोडील असा आकान्त आहे तुझा. काय झालं ग तुला ? अंगावर हा दुल्हनचा पोषाख....त्याची लक्तरं कशानं झाली ? जगदीशशी लग्न झालं तुझं ? जगदीश कुठाय ? तुला सोडून गेला का तो ? त्याचं काही बरंवाईट तर केलं नाही ना तुझ्या गानभरी राक्षसांनी ! सांग....सांग.... अग काही तरी बोल !

[ रैना निर्विकार मुद्रेने टुकू टुकू पाहात कटोरा पुढे करते तशी— ]

**कृष्णकान्त :** ही गानभरींची रीत. कटोऱ्यात पैसा पडल्याशिवाय ते तोंडसुद्धा उघडायचे नाहीत.

**दामोदर :** तर काय ? गाण्याची झलक दाखवतात आणि तुम्ही भुललात की कटोरा पुढं करतात.

**ऋता :** काहीतरीच बोलू नका तुम्ही. अरे ही तर पार वेडी झालेली दिसतेय. ( तिच्या खांद्यावर हात ठेवीत ) बाई, तू मागशील ते तुला देईन....पण जगदीश कुठाय ! सुखरूप आहे ना, तेवढंच सांग. [ रैना कटोरा हालवून पुढे करते, तशी– ] पैसे दिल्यावर तरी बोलशील ?

[ चिमुकल्या पर्समधून हाताला येतील ती नाणी ऋता रैनाच्या कटोऱ्यात टाकते. तशी स्वरमंडल छेडीत रैना दुसरे विरहगीत गाऊ लागते ]

चांदण्या माळून डोई राजसा मी चालते
पैलतीरी प्रणयिनी ही आर्त हाका घालते
रे तुझ्यासंगे फुलांचे गीत गावे मदभरी
प्राशुनी डोळे तुझे मी चन्द्रम्याशी बोलते
अंतरी झंकारती ह्या शब्दवीणा कापऱ्या
मी तुझ्या दारासभोती वेल होउन डोलते
प्राण माझे गीत होते जे तुझ्या कंठातले
सांग सखया की तुझ्याविण ह्या जगाचे मोल ते

[ गीत गाता गाता निघून जाते ]

**कृष्णकान्त :** खचित काही तरी वेडंवाकडं घडलंय....

**ऋता :** अरे ती वेडी झालीय. अंगावर दुल्हनचा वेश....याचा अर्थ लग्न झालंय त्याचं....की मोडलंय ? कशामुळं खूळ जडलं हिला !

**दामोदर :** शंखराजाचा शाप तर त्या दोघांना भोवला नसेल ?

**ऋता :** पण ही अशी एकटी....एकाकी का फिरतेय ? भैरवबाबा कुठाय ? बाकीचे गानभरी लोक कुठं आहेत ?

**दामोदर :** गानभरींचा तळ हाललाय असं तो नावाडी सांगत होता मला.

**ऋता :** आणि मग ही ही...एकटीच मागं राहिली ?

**कृष्णकांत :** उघडच आहे ऋताताई. गानभरींनी वेड लागल्यावर तिला सोडून दिलं असावं.

**ऋता :** आणि जगदीश—?

[ तोच विश्वनाथबुवा आणि माई बोलत येतात. माई म्हणत असतात—" देवा-पुढं गायचं असेल तर गावं, मागणं मागायचं असेल तर नवस बोलावा, पण असं भलतं सलतं साकडं घालू नये देवाला." ]

**विश्वनाथबुवा :** त्यात भलतं सलतं काही नाही मनू. गाण्याच्या व्यवसाया-तून मी निवृत्त होतोय असं फार तर समजा.

**माई :** असं काहीतरीच कसं समजता येईल ? ऋता, कृष्णकान्त, दामोदर, मी सांगून थकले. आता तुम्हीच काही धरणं धरता आलं यांच्यापाशी तर पाहा.

**बुवा :** मनू मी ठरवलंय ते पूर्ण विचार करून ठरवलंय. या मुलांना आणिक भरीला घालून काय साधणार आहे ?

**कृष्णकांत :** दादा.... म्हणजे तुम्ही खरंच आजच्यानंतर पुन्हा कधीही गाणार नाहीत ?

**बुवा :** अरे कृष्णकांत, देवापाशी काही दुर्मिळ मागणं मागायचं असतं तेव्हा आपल्याला सर्वात जे प्रिय असतं ते देवाला अर्पण करावं लागतं. देवाला अर्पण करायला गाण्यावाचून दुसरं प्रिय माझ्यापाशी काय उरलंय रे ?

**ऋता :** तेवढ्यानं काय चमत्कार घडणार आहे दादा ?

**बुवा :** या सृष्टीत ईश्वरी न्याय आहे की गानभरी दैत्यांचा न्याय आहे त्याचा निवाडा तरी लागेल. रज्जू गेली त्या वेळी शंखराजाचा शाप मला भोवला असं मी मानलं— आता जगदीशही—

**माई :** कशाला नको ती आठवण काढलीत या वेळी ?

**बुवा :** मनू, तू खूप सोसलं आहेस तसंच मीही सोसलंय. अगदी अपरंपार दुःख वेदना, यातना आपण दोघांनी घट्ट ओठ मिटून सोसल्या आहेत. पण आता-देखील पुन्हा—

**ऋता :** दादा, ही रज्जू कोण ? माई काय प्रकार आहे हा सगळा ?

**माई :** झालं ? केलेला निश्चय मोडलात ? आता काय सांगणार या मुलांना ?

**बुवा :** सोमेश्वराचं दैवत जागृत आहे, म्हणून तर जगदीशसाठी मी साक्षात

देवाला साकडं घालायला सिद्ध झालोय. या वेळी तरी ऋताला, कृष्णकांतला आणि दामोदरला खरं काय काय घडलं ते कळायलाच हवं.

**माई :** मी काय सांगते ते अजून तरी ऐकावं—

**बुवा :** नाही, मनू....मुलासारखा मानलेला जगदीश नाहीसा झाला....या दोन तीन महिन्यांत त्याचा ठावठिकाणाही लागलेला नाही—आता मी स्वस्थ बसणार नाही. रज्जूच्या बाबतीत काय घडलं ते या मुलांना कळायलाच हवं. देवाच्या दारात उभा राहिल्यावर कोणापासूनही मला काहीही लपवून ठेवायचं नाही. ऋता बेटी, रज्जू म्हणजे रजनी. आमची मुलगी. हयात असती तर आज ती तुझ्याएवढी असती पण...पण....( थबकतो. क्षणभराने ) गानभरींचं गाणं मी कसं काय गाऊ शकतो याचं त्या वेळी जगदीशसकट तुम्हा सर्वांनाच कोडं पडलं होतं नाही ? क्वचित असावध क्षणी गुणगुणण्याशिवाय चुकूनही मी ते गाणं कधी गायलो नाही की कोणाला शिकवलं नाही, याचंही तुम्हाला गूढ वाटलं होतं, नाही ? जगदीशला शोधण्यासाठी आपण अरण्यात भटकलो त्यावेळी गानभरींच्या एकूण एक जागा, वसतीच्या खुणा मला कशा काय ठाऊक झाल्या, याचं तुम्ही आश्चर्य मानलं होतं, नाही ? जवळजवळ वीस वर्षं झाली असतील त्या घटनेला. एका अदम्य महत्त्वाकांक्षेने त्या काळी मी पेटलो होतो. जगातली सगळी गायकी पादाक्रांत करण्याच्या जिद्दीनं मी उसळलो होतो. त्यामुळंच गानभरींचं गाणं ऐकल्यावर जगदीश जसा भारून गेला तसाच त्या काळी मीही वेडापिसा झालो होतो. त्या भरात काय वाटेल ते झालं तरी बेहेत्तर पण गानभरींची गायकी मला मिळालीच पाहिजे असं शंखराजाजवळ मी मागणं मागितलं.

**कृष्णकांत** : दादा तुम्ही ? शंखराजाजवळ ?

**बुवा :** होय कृष्णकांत, अवलियाचे सगळे शब्द विसरून, सगळे इशारे धुडकावून लावून मी मागणं मागितलं. त्यानंतर काही दिवस काहीच घडलं नाही. तेव्हा शंखराजाच्या शक्तीवरचा माझाही विश्वास डळमळला. वेषांतर करून गानभरींच्या तळावर मी गानभरी होऊन कित्येक दिवस राहिलो. मला कोणी ओळखलं नाही किंवा ओळखूनही त्या वेळी कोणी माझी दखल घेतली नाही, ही शंखराजाची कृपा होती हे आता लक्षात येतं. गायकी शिकून मी परत आलो. त्या विजयानं फुशारून जाऊन मोठा थाटमाट, सोहळा करून इथं याच पटांगणात देवासमोर मैफील रंगवली. शेकडो रसिकांची दाद मिळविली. भैरवी गाऊन कृतार्थ होऊन मी उठलो, श्रोते तृप्त होऊन पांगले आणि...आणि...घरी जायला आम्ही निघालो त्या वेळी लक्षात आलं की चारपाच वर्षांची चिमुकली रज्जू नाहीशी झालीय.

**ऋता :** नाहीशी झाली म्हणजे ?

**माई :** अग, इथंच देवळात खेळत होती, म्हणून माझंही लक्ष राहिलं नाही... त्रिखंड शोधलं ग...पण.... (डोळ्याला पदर लावते.)

**दामोदर :** पण म्हणजे झालं तरी काय तिचं ?

**बुवा :** मागशील ते मिळेल पण जे मिळेल त्यासाठी जन्मभर तडफडत तळमळत पश्चात्ताप करावा लागेल. ही अवलियाची वाणी त्या वेळी मला आठवली. गानभरींनी तिला पळवली आणि.... ( थबकतो )

**ऋता :** ( थरारत ) ठार मारली ? त्या कोवळ्या मुलीला ?

**कृष्णकांत :** गानभरींनी ?

**बुवा :** होय कृष्णकांत. इतकं अघोरी कर्म सूडबुद्धीनं करणारे कोण चांडाळ असणार ?

**ऋता :** (घाबरून ) प...पण म्हणजे त्यांनी केलं तरी काय त्या अश्राप मुलीचं ?

**बुवा :** ( सुस्कारत ) श्रीहरी ! श्रीहरी !

**माई :** (भरल्या डोळ्यांनी) आठ दिवसांनी रक्तानं भरलेले तिचे कपडे चांडाळांनी दारात आणून ग टाकले आमच्या. [ ऋताच्या गळ्यात पडून रडू लागते. ऋता कळवळून तिला सावरते. ]

**ऋता :** मी आज प्रथमच ऐकतेय हे सगळं दादा.

**बुवा :** तुझ्या आईवडिलांकडून आम्ही तुला हे सगळं विसरण्यासाठी आणली तेव्हाच या विषयावर कोणीही कधीही चुकूनसुद्धा बोलायचं नाही असं ठरलं होतं आमचं.

**कृष्णकांत :** तुम्ही पोलिसात वर्दी दिली नाहीत त्या वेळी !

**बुवा :** सगळे सोपस्कार केले. काहीही निष्पन्न झालं नाही. रानावनात वास्तव्य करणारे हे भटके रानभरी पोलिसांना दाद देतील असं वाटतं तुला ? अरे मी त्यांना फार जवळून पाहिलंय. खूप ओळखून आहे मी त्यांना. ( माईच्याकडे पाहात ) मनू, शोक आवर.

**ऋता :** बिचारी माई....किती तडफडत असेल ग तुझा जीव....

**बुवा :** बास बास—आता या विषयावर कोणीही बोलायचं नाही. मनू, माझ्या अपराधाचं प्रायश्चित्त मला मिळालं. आपण ते निमूटपणाने भोगलं. केवळ माझ्यासाठी, तुझा काहीही अपराध नसताना, तूसुद्धा भोगलंस. म्हणूनच आज ताठ मानेनं जगदीशसाठी देवाला मी हे साकडं घालू शकतो. कृष्णकांत, ऋता, तंबोरा घ्या. दामोदर, तबल्यावर बैस. [ तिघे वाद्ये घेऊन बसतात तशी— ]मनू, शोक आवरला पाहिजे तुला.

**बुवा :** देवाला साकडं घालण्यासाठी मी आज गायला बसतोय. ही शेवटची बैठक प्रसन्न चित्तानंच पार पडायला हवी.

**माई :** ( डोळे पुसत ) नाही हो....हे पाहा मी डोळे टिपले. मी अगदी प्रसन्न मनानं देवासाठी माळ गुंफत बसते ही अशी. ( बसते. )

**बुवा :** ( बैठकीवर बसत ) मुलांनो, श्रीशंकराच्या प्रार्थनेपासूनच आपण या महायज्ञाला प्रारंभ करू या.

[ क्षणमात्र हात जोडून, डोळे मिटून बुवा ध्यान करतात. तंबोरे छेडले जातात. तबल्यावर थाप पडते. बुवा सूर लावतात आणि गाऊ लागतात ].

जय जय हे शिवशंकर । पार्वतीशनृत्यवरा
दर्शनास भक्त उभे आले तव मंदिरा ॥

नटराजा तूच आद्य
पूर्ण करिसि सकल साध्य
स्वररंगे भरुनी दे हृदयाचा गाभारा ॥

[ गीत संपता संपताच समोर येऊन उभा राहतो भैरवबाबा. त्याला पाहताच बैठक विस्कटल्यासारखी होते. " कोण ? भैरवबाबा तू ? " असे उद्गारत बुवा उठतात आणि मग सगळेच उठतात; तशी....]

**भैरवबाबा :** होय. मी भैरवबाबा. विसूबाबा तू अजून माझी ओळख ठेवली आहेस तर ?

**बुवा :** ( उपरोधाने ) अरे तुझी जानपछान इतकी सहजासहजी विसरता येण्यासारखी आहे थोडीच ?

**भैरवबाबा :** बरोबर आहे. फार वर्षांपूर्वी वेष बदलून एक गानभरी म्हणून तू आमच्या गोटात शिरलास, तळावर राहिलास, गानभरींची गायनकला तू गानभरींना फसवून शिकलास आणि आलास तसाच एक दिवस नाहीसा झालास.

**बुवा :** भैरवबाबा, तुम्हा अडाणी गानभरींच्या कैदेतून तुमची गायकी मुक्त करण्यासाठी ते धाडस मला करावं लागलं. त्यासाठी माझ्या मुलीचा रज्जूचा बळी घेऊन तू मला शासन केलंस.

**भैरवबाबा :** तुझ्या अपराधासाठी खरं म्हणजे तुलाच ठार मारायला हवं होतं. गानेश्वरापाशी तसा बेलभंडार उचलूनच त्या रात्री मी आलो होतो.

**बुवा :** मग का नाही मला मारलंस ?

**भैरवबाबा :** तुझं गाणं ऐकलं तेव्हा वाटलं की तुझ्या छातीत खंजीर खुपसणं म्हणजे एक दैवी गाणं ठार मारणं. तुला असं मरण देण्यापेक्षा तुझं गाणं जिवंत ठेवून तुला जन्मभर मरणप्राय वेदना भोगायला लावणारी शिक्षा करायची होती मला. म्हणून तुझी रज्जू मी उचलून नेली.

**बुवा :** अरे पण त्या मुलीनं तुझा काय अपराध केला म्हणून तिला इतक्या

क्रूरपणानं तू जीवं मारलीस !

**भैरवबाबा :** तिला मी मारली नाही की कोणी गानभरींनी मारली नाही.

**बुवा :** रक्तानं भरलेले तिचे कपडेदेखील....

**भैरवबाबा :** तुला दिलेल्या शिक्षेचाच तो एक भाग होता. विसूबाबा. ते रक्त शिकार केलेल्या जनावराचं आहे की माणसाचं आहे हे शोधून पाहण्याचीसुद्धा तुला अक्कल सुचली नाही ?

**माई :** ( किंचाळत ) म्हणजे माझी रज्जू जिवंत आहे अजून ? कुठं आहे ? कुठं आहे माझी रज्जू !

**बुवा :** भैरवबाबा. काय केलंस माझ्या पोरीचं ते आता तरी खरं सांग.

**भैरवबाबा :** तेच सांगायला आलोय, तुझी रज्जू म्हणजेच आमची रैना. गानेश्वराची राणी. गानभरींच्या गायनकलेचा चन्द्र.

**ऋता :** ( आश्चर्यानं ) रज्जू म्हणजे रैना ?

**कृष्णकान्त :** जिच्यासाठी जगदीशनं जीव टाकला होता ती रैना ?

**बुवा :** तिला तुम्ही गानेश्वराला वाहिलीत ? तिची देवदासी केलीत ?

**भैरवबाबा :** केली होती. पण तुझ्या शिष्यानं जगदीशनं तिला नादी लावली. त्याच्याशी लग्न करायचा तिनं हट्ट घेतला म्हणून....

**बुवा :** तू त्याला मारून टाकलंस ?

**भैरवबाबा :** मी त्या दोघांचं लग्न लावून दिलं. गानभरींच्या रीतिरिवाजाप्रमाणे अगदी थाटामाटात गानेश्वराच्या साक्षीनं त्याची राणी मी जगदीशला दिली. त्या दोघांना बजावून सांगितलं की, जे मी समजून घेतलं ते बाकीचे गानभरी उमजणार नाहीत. तुम्ही आता इथं क्षणभरही थांबू नका. नदीपार व्हा. त्यांनी माझं ऐकलं नाही. शंखराजाच्या शक्तीचा प्रत्यय यायचा होता त्यांना, म्हणूनच आमच्या तळावर रेंगाळण्याची त्यांना दुर्बुद्धी झाली.

**बुवा :** दुर्बुद्धी झाली ? काय झालं काय त्यांचं भैरवबाबा ?

**भैरवबाबा :** दोन गानभरींनी खंजिरानं त्यांना भोसकलं.

**कृष्णकान्त :** भोसकलं म्हणजे ठार मारलं ?

**भैरवबाबा :** मरायचाच तो. मेलाही असता. पण मी त्याला गुहेत पळवला, लपवून ठेवला. त्याच्यावर औषधी पाला लावला, खैर गानेश्वराची म्हणून तो वाचला.

**बुवा :** श्रीहरी, श्रीहरी ! जगदीश्वरा, तुझी लीला अगाध आहे. भैरवबाबा, अरे जगदीशासाठी आज मी साक्षात सोमेश्वराला साकडं घालायला बसलो होतो. रज्जू आणि जगदीश कुठं आहेत ते तरी सांगशील ?

**भैरवबाबा :** विसूबाबा, गानभरींच्यापासून जगदीशला दूर लपवून छपवून एका

गुहेत उपचार करण्यात मी गुंतलो होतो. त्यामुळं रैना कुठं आहे ते मला बघायलाच झालं नाही. गानभरींचा तळ उठल्यापासून ती एकटीच या रानावनात भटकत फिरतेय असं ऐकलंय मी. तिची साद ऐकून असेल—जगदीशही कालपासून गुहेतून नाहीसा झालाय.

**कृष्णकान्त :** याचा अर्थ पुन्हा हिंडण्याफिरण्याइतका तो बरा झालाय दादा.

**बुवा :** शंखराजामुळं नवीन काही संकट तो ओढवून न घेवो म्हणजे झालं.

**भैरवबाबा :** तसं होणार नाही विसूबाबू. ( कडुसरीचा शंख काढून देत ) हा तुझा शंखराज तुला परत द्यायलाच मी आलो होतो.

**बुवा :** ( विस्मयाने ) शंखराज ? तुझ्या हाती लागला ?

**भैरवबाबा :** घाबरू नकोस. शंखराजाजवळ मी काहीही मागणं मागितलं नाही.

**बुवा :** मागणं मागणाऱ्याला अपार अपार दुःख सोसावं लागतं भैरवबाबा.

**भैरवबाबा :** ते मी पाहतोच आहे. तू गानभरींची गायनकळा मागितलीस. जगदीशनं गानेश्वराची राणी मागितली. अरे माणसानं स्वतः पराक्रमानं मिळवायच्या गोष्टीसाठी दैवी शक्ती पणाला लावल्या तर दुःखाशिवाय दुसरं काय वाट्याला येणार ? घेऊन जा तुझा शंखराज !

**बुवा :** हा घेऊन मी काय करू ? कोणाला देऊ !

**माई :** ( बुवांच्या हातून शंख घेत ) द्या तो माझ्याकडे. ( ओंजळीत घेत ) देवा....देवा....मी मागणं मागतेय....माझी रज्जू मला भेटू दे....लवकर लवकर भेटू दे.

**बुवा :** ( धावून शंख हिसकावून घेत ) मनू मनू, तू हे काय केलंस ? झाला एवढा अनर्थ कमी होता, म्हणून का तू शंखराजाला मागणं मागितलंस ?

**माई :** ( रडत ) माझी रज्जू हवीय मला....त्यासाठी वाटेल तेवढं दुःख सोशीन मी.

**बुवा :** श्रीहरी, श्रीहरी ! आता जे घडेल ते निमूटपणं पत्करण्यावाचून दुसरा मार्गच नाही. कृष्णकांत, दामोदर आता रे काय करायचं ?

**कृष्णकांत :** दादा, मी आणि दामोदर त्या दोघांचा शोध घेऊन येतो.

**बुवा :** भलतंच काय ? सांजवेळी या अरण्यात तुम्ही त्यांचा कुठं कुठं शोध घेणार ? भैरवबाबा, इतके उपकार केलेत तसे...

**भैरवबाबा :** गफलत करू नकोस विसूबाबा. मी तुला, तिला आणि त्याला वाचवलं ते काही तुम्हा माणसांवर माझा जीव गुंतला होता म्हणून नाही. माझा जीव जडलाय तुम्हा तिघांच्या गळ्यातल्या गानेश्वरावर.

**बुवा :** कबूल आहे भैरवबाबा, तू सच्चा गानभरी आहेस. पण रज्जूला कुठं कुठं जाऊन शोधायची हे तर सांगशील ?

**भैरवबाबा :** शोधासाठी कुठंही जायची गरज नाही. विसूबाबू, कधी काळी तू

गानभरींच्या तळावर राहिलेला आहेस. गानभरींच्या रीतीनं तू साद घाल. गानेश्वराच्या मनात असलं तर ती खचित परत येईल.

**बुवा :** अरे ती साददेखील मी विसरलोय रे भैरवबाबा, तूच तिला साद घाल,

**भैरवबाबा :** विसूबाबा, तू खरोखरीच सगळं काही विसरला आहेस. अरे गानभरीत जन्म घेऊनदेखील मला गळा नाही. गळा नाही म्हणून तर गाण्यावर माझा एवढा जीव जडलाय. तळावर राहून जी गानकळा तुला मिळाली नाही ती तुझ्या मुलीला मी मिळवून दिली. प्रयत्न कर आणि रैनाला साद घाल.

**माई :** मी प्रार्थना करते तुम्हाला, माझ्यासाठी तरी तुम्ही तिला साद घाला.

**बुवा :** जगदीश्वराच्या मनात काय आलंय आज ? गानभरी रीतींने आलापी घेण्याचा यत्न करतात. भैरवबाबा मान नकारार्थी हालवीत 'नाही....नाही' असे उद्‌गारतो. बुवा पुनः पुन्हा आलापी घेऊ पाहतात. भैरवबाबा "नाही... नाही विसूबाबा, ही गानभरी साद नव्हे. बुवा पुन्हा प्रयत्न करतात, तेवढ्यात जवळून कोठून तरी जगदीशच्या स्वरातली साद ऐकू येते. तसे सगळे चकारतात.

**बुवा :** हा जगदीशचा आवाज.

**भैरवबाबा :** पोरगा इथंच जवळपास कुठं तरी आहे. विसूबाबू ही अस्सल गानभरी साद.

**कृष्णकांत :** (एका दिशेने धावत ) हा काय तटावर उभा आहे. जगदीश...

[ कृष्णकांत आणि दामोदर जातात.]

**बुवा :** जगदीशश्वरा, माझं साकडं मानून, माझे अपराध पोटात घालून मला जगदीश परत दिलास, तशी माझी रज्जू मला परत दे.

**माई :** ( हात जोडून रडत ) देवी अंबाबाई, खणानारळानं तुझी ओटी भरीन, माझी रज्जू मला परत दे...

[ जगदीशची आलापी आणि त्यावर रैनाचा प्रतिसाद ऐकू येतो. तशी—]

**भैरवबाबा :** ही रैनाची साद. [ झटकन जातो. ]

**बुवा :** ही हीच रज्जू ? जय जय श्रीशंकर...जय महादेव.

**माई :** रज्जू...रज्जू, रज्जू आली ? रज्जू आली ? ( अत्यानंदाने हसू लागते. )

**ऋता :** माई, आनंदानं हुरळून जाऊ नको. रज्जूला मी पाहिलीय मघाशी ती काही तुम्हा दोघांना ओळखेलसं मला वाटत नाही.

**माई :** सगळं सांगितल्यावर ओळख नाही का पटायची ?

**बुवा :** मनू अधीर होऊ नकोस.... तटावरून माणसं इकडंच येताहेत !

[ तेवढ्यात लगबगीने कृष्णकांत आणि दामोदर समवेत जगदीश येतो आणि बुवा आणि माई यांना वंदन करतो. "आयुष्यमान भव" म्हणून ते आशीर्वाद देतात तशी—]

**बुवा** : कसा आहेस तू बेटा ?

**जगदीश** : आपल्या आशीर्वादानं आणि भैरवबाबांच्या कृपेमुळं दादा मी सुखरूप आहे.

**माई** : रज्जू कुठाय रे जगदीश ?

**जगदीश** : भैरवबाबा, तिची समजूत घालून येताहेत इकडे.

**बुवा** : समजूत घालून म्हणजे ?

**जगदीश** : दादा माई काय सांगू ? कसं सांगू ? माझ्यावर हल्ला झाला त्या क्षणापासून तुमची रज्जू माझी रैना भ्रमिष्ट झालीय.

**बुवा** : काय, रज्जू भ्रमिष्ट झालीय ?

**माई** : ( किंचाळत ) नाही...नाही... असं होणार नाही.

**ऋता** : माई, मन घट्ट ठेव. जगदीश म्हणतोय ते खरं आहे... रज्जू वेडी झालीय.

**माई** : ( किंचाळत) का—? देवा, देवा हे असं का केलंस ?

**बुवा** : मनू आता मन आवर. निर्धारानं संयम ठेव. शंखराजाजवळ जे मागणं तू मागितलंस ते तुला मिळालं. आता पश्चात्ताप करायला लावणारं प्रायश्चित्तही भोगायची तयारी ठेव.

[ तोच भैरवबाबा ठार वेड्या झालेल्या रैना ऊर्फ रज्जूला घेऊन येतो. तिच्या अंगावर वेष तोच. मुद्रा तशीच भयाण निर्विकार.... "ये बेटी" असे म्हणत भैरवबाबा तिला हाताला धरून पुढे आणतो. तिला पाहताच माई 'रज्जूऽऽ' म्हणून हंबरडा फोडीत धावत जाऊन तिला मिठी मारतात. ऋता माईंना आवरू बघते. तिचे मुख कुरवाळीत माई गदगदून रडत म्हणतात– 'देवा, देवा ही कसली रे भेट घडवलीस ?' रज्जू ऊर्फ रैना मात्र थंडपणे टुक टुक पाहात माईंना दूर लोटते तशी—]

**जगदीश** : माई, तुम्ही दूर व्हा आणि मनाला आवर घाला. तुम्ही आकांत कलात तर रज्जूवर फारच विपरीत परिणाम होईल.

[ माईंना ऋता बाजूला नेते. विश्वनाथबुवा संयमाने पुढे होत तिच्या खांद्यावर हात ठेवीत तिच्या डोळ्यांत पाहात—]

**बुवा** : रज्जू....रज्जू....

**भैरवबाबा** : रज्जू म्हणून तिला समजणार नाही विसूबाबू. तिला रैना म्हणून हाक मार...

**बुवा** : ( थरथरत ) रैना...रैना बेटी....मला ओळखलंस का तू ?

**जगदीश** : त्याचाही काही उपयोग नाही भैरवबाबा. कालपासून तीन वेळा तिची माझी भेट झाली. मी खूप तऱ्हेने तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला. पण

एका गीतगायकीखेरीज कसलाही समज तिला उरला नाही.

**बुवा** : रैना...रैना...अग एक शब्द तरी बोल तुझ्या बापाशी.

**जगदीश** : त्यातून जरा नजर ढळली की बघता बघता दूर निघून जाते ही. तिला शोधता शोधता माझ्या पायाची चाळण झालीय अगदी.

**बुवा** : रैना रैना...अग बेटी, शब्द नको असले तर सूर तरी गा.

**जगदीश** : फक्त आलापीची साद घातली की असेल तिथून धावत येते आणि– [ रैना बुवांच्याकडे पाहात हातातला कटोरा पुढे करून हालवते. ] असा कटोरा पुढे करून हालवते आणि थांबून निघून जाते.

**बुवा** : याचा अर्थ काय भैरवबावा ?

**भैरवबाबा** : विसूबाबू, अरे ही पैसे मागण्याची गानभरी रीत आहे.

**ऋता** : होय, होय दादा. मघा ती भेटली, असाच कटोरा पुढं केला, मी त्यात काही नाणी टाकली तशी ती गायला लागली.

**बुवा** : तुम्ही लोक मला काय सुचवता आहात ? मी....मी....या पोटच्या मुलीच्या कटोऱ्यात पैसे टाकू ? तिचे बोल ऐकायसाठी मी तिला...

**जगदीश** : दादा, रैना भ्रमिष्ट आहे याचा विचार करा. सुबुद्ध जगाशी तिचा एकुलता एक पाश उरलाय... तो पाश म्हणजे गाणं. तो पाश तरी तोडून टाकू नका. उद्या तिच्यावर उपचार करताना हाच धागा उचलावा लागेल. तिनं कटोरां पुढं केलाय, पै-पैसा तरी टाका.

**बुवा** : ( डोळे भरून येत, खिशात हात घालून मूठभर नाणी, नोटा तिच्या कटोऱ्यात टाकत ) देवा... देवा ही काय पाळी तू माझ्यावर आणलीस ?

**भैरवबाबा** : शंखराजाचा हा शाप आहे, हे शासन आहे, विसूबाबा.

[ रैना कटोऱ्यात नाणी पडताच स्वरमंडल छेडीत ते गीत गाऊ लागते. ]

( विश्वनाथ बुवा आणि रैना यांचे गीत )

छेडुन गेले मधुर स्वर विमल
आज उपवनी कोण पाहिले
प्राणांचे ऋतुगंध उमलुनी
जीवन संगीत त्यास वाहिले
मदिर रातही अधिर चंद्रिका
गात्रामधुनी हसे राधिका
डोळे टिपले पानांचेही पहाट होता दहिवर ओले
कंठामधुनी सूर झुलावा
सुरात तुझिया जीव फुलावा
मीलन होता मधुभावाचे ह्या जन्माचे सार्थक झाले ॥

[ रैनाच्या आवाजातला दर्द बघून सगळेच अवाक् होतात. आपण कधीकाळी रचलेले गीत रज्जू ऊर्फ रैनाच्या तोंडी ऐकून बुवाही चकित होतात. गीत सुरू होताच ते एकदम उद्गारतात— " अरे भैरवबाबा, गानभरींच्या पद्धतीवर गुंफलेली ही तर माझी गीतरचना. " त्यावर भैरवबाबा म्हणतो, " ऐक विसूबाबू ऐक, चार-पाच वर्षांची रैना होती, तेव्हा नुसतं ऐकून ऐकून शिकलीय ती हे गीत. " गीताचा पूर्वार्ध संपतो तशी ती थबकते. ]

**भैरवबाबा :** गा बेटी गा. आज तरी हे गीत संपूर्ण गा.

**बुवा :** भैरवबाबा, ती कशी गाईल ? तू तिला नेलीस, त्या वेळी या गीताचा पुढचा भाग मुळी रचलेलाच नव्हता.

**जगदीश :** पुढचा भाग ? कोणता भाग दादा ?

**बुवा :** ऐका भैरवबाबा, ऐक जगदीश...तुझ्यासाठी गातोय बेटा—

[ विश्वनाथबुवा त्या गीताचा उत्तरार्ध बेभानपणे गातात. रैनासकट सगळे मंत्रमुग्ध होऊन ऐकत राहतात. गीत संपल्यावर ' वाहवा जी–वाहवा ! ' करून भैरवबाबा दाद देतो. रैना पाठ वळवून जाऊ लागते तशी—

**माई :** तिला जाऊ देऊ नकोस जगदीश– माझ्या प्राणाची शपथ आहे.

**जगदीश :** ( रैनाचा हात धरून तिला थांबवीत ) नाही माई, तुम्ही काळजी करू नका. तिचा हा हात मी एकदा हाती घेतलाय तो सोडण्यासाठी नाही. रैना रज्जू शहाणी झाली नाही, तरी मी तिला कधीही कधीही अंतर देणार नाही.

**बुवा :** बास...सगळं भरून पावलं. मनू, तुला— मला तरी या पेक्षा जास्त काय हवंय ग ?

**भैरवबाबा :** विसूबाबू , मी येतो आता. पुन्हा कधी आपली गाठभेट होणार नाही.

**बुवा :** असं का म्हणतोस रे भैरवबाबा ?

**भैरवबाबा :** विसूबाबू , गानभरींची गायनकळा आता दुनियेत दरवळेल.... मला त्यात आनंद आहे. पण गानभरींचा मी अक्षम्य गुन्हा केलाय. त्याचं शासन मला....गानभरींच्या नायकालाही, दिल्याशिवाय ते राहणार नाहीत. पण आता मला कसल्याही शासनाची तमा नाही.

**बुवा :** भैरवबाबा, माझ्यावर एक उपकार कर. हा शंखराज घेऊन जा.

**भैरवबाबा :** ( हसून ) शंखराजाकडे मी जिवाची भीक मागेन असं तुला वाटतं ?

**बुवा :** नाही. तू शंखराजाजवळ काहीही मागणार नाहीस याची मला पक्की खात्री झालीय. म्हणूनच तू तो घेऊन जा. तोच तुझं रक्षण करील. तो जपण्या–पूजण्याचा अधिकार फक्त तुलाच आहे. आमच्यापैकी कोणालाच नाही.

[ भैरवबाबा ओंजळ पुढे करतो. बुवा त्याच्या ओंजळीत शंखराज ठेवतात. नमस्कार करतात. भैरवबाबा शंखराज मस्तकी लावून जाऊ लागतो तशी—]
थांब भैरवबाबा. अरे तू स्वतःच्या बळावर अनर्थालाही एवढा कल्याणकारी अर्थ दिलास– सांग आम्ही तुझे कसे उतराई होऊ ?

**भैरवबाबा :** त्याची काही गरज नाही, विसूबाबा. त्याची काही गरज नाही.

**बुवा :** नाही भैरवबाबा. काही तरी माग. अरे तुझी अल्पशी इच्छा पुरी केल्याचं समाधान तरी मला मिळू दे.

**जगदीश :** भैरवबाबा, तुम्ही तर मला दुसरा जन्म दिलात. बोला, मी तुमच्यासाठी काय करू ?

**भैरवबाबा :** ( विषण्ण स्मित करीत ) विसूबाबू, जगदीश तुम्हाला ठाऊक आहे. हा भैरवबाबा, कधी कधीही, कोणा माणसात जीव लोभावून पडला नाही. जीव जडलाय तो गायनकलेवर. जे मी केलं असं तुम्ही मानता ती तर गानेश्वराची प्रेरणा, नव्हे आज्ञा होती. तुम्ही मला मागचं म्हणता तर विसूबाबू, जगदीश मला, गाण्याचा गळा नसलेल्या एका गानभरीला फक्त एकच धुंद गाणं ऐकवा. असं धुंद, बेभान करणारं गाणं ऐकवा की जाण्याची उरलेली परतीची वाट कधी संपली, ते मला कळता कामा नये.

**बुवा** : आज्ञा प्रमाण आहे. कृष्णकांत, दामोदर, ऋता—
[ पण हे ऐकण्यापूर्वीच कृष्णकांत आणि ऋता यांनी तंबोरे उचलले आहेत. दामोदर तबल्यावर बसला आहे. विश्वनाथबुवा, मध्ये रैना ऊर्फ रज्जू आणि दुसऱ्या बाजूला जगदीश उभे राहतात. रैनाचा एक हात जगदीशच्या हाती तर दुसरा हात बुवांच्या हाती. बुवा सूर लावून गायला सुरुवात करतात ].

**परब्रह्म भेटीलागी धरेवरी आले**
**सूर सूर चैतन्याचा रोम रोम झाले ||**
**वेद वेदनांचे गाती पुरे हा प्रवास**
**अगा आनंदाचे गाणे फुटे पहाटेस**
**चांदणे फुलांच्या ओठी फुलारून आले ||**
**तुझा श्वास माझा ध्यास नुरे दुजे काही**
**तुझी भक्ति माझी मुक्ती भरे दिशा दाही**
**विश्व आत्मरूपी अवघे एकरूप झाले ||**

[ क्षणभराने जगदीश त्यांना साथ देतो. भैरवीचे धुंद प्रसन्न सूर वातावरण भारून टाकतात. रैना ऊर्फ रज्जू टकमका एकदा बुवांच्याकडे तर एकदा जगदीशकडे बघत राहते आणि....

एकाएकी रैना सहजगत्या सूर लावून गाऊ लागते. बेभानपणे गाऊ लागते. बुवा, जगदीश आणि भैरवबाबा अत्यानंदाने एकमेकांकडे बघतात. तिघेही गाऊ लागतात. नेमका तो क्षण टिपून, डोळ्यांतले पाणी टिपत भैरवबाबा मागल्या पावली निघून जातो. त्याच वेळी पडदा. ]

अंक तिसरा समाप्त

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. १८८७७ नों. दि. २०/८/...
वि. नाटक ...

IRBK-0118877
IRBK-0118877